मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४२ ■ शुक्रवार, १५ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# शून्यातून विश्व निर्माण करणारे रामशेठ ठाकूर म्हणजे ! आधुनिक काळातील 'एकलव्य' : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** "सामान्य माणसाने असामान्य कसं व्हायचं, याचा वस्तुपाठ म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास आहे. ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना घडवलं, त्याच संस्थेला आजवर 135 [कोटींहून अधिक रुपयांची गुरुदक्षिणा देऊन त्यांनी आधुनिक काळातील 'एकलव्य' ही ओळख सार्थ ठरवली आहे," अशा गौरवपूर्ण शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला.उलवे येथे 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल'च्या नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी अभिष्ठचिंतन सोहळयाप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

या दिमाखदार सोहळ्याला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर ज्येष्ठ नेते तथा राज्यसभा खासदार शरद पवार हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला वनमंत्री गणेश नाईक,माहिती व तंत्रज्ञान (IT) आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार व सदस्य मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा दिलीप वळसे पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य तथा आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष तथा आमदार महेश बालदी आणि आमदार रविंद्र चव्हाण, रायगड-नवी मुंबईतील आमदार मंदाताई म्हात्रे, आ. रविशेठ पाटील, आ. महेंद्र दळवी, आ.महेंद्र थोरवे, आ. विक्रांत पाटील, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, रयत शिक्षण संस्था, साताराचे चेअरमन चंद्रकांत दळवी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, अतुल पाटील या मान्यवरांसह मोठया संख्येने विद्यार्थी पालक आणि नागरिक उपस्थित होते.









नवी मुंबईतील सेक्टर 12 उलवे नोड येथे आज एक भव्य राजकीय आणि सामाजिक सोहळा संपन्न झाला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल'च्या नूतन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळाही मोठ्या थाटामाटात पार पडला.

रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, सामान्य कुटुंबात जन्म घेऊन मेहनतीच्या जोरावर असामान्य कर्तृत्व कसं गाजवायचं, याचा वस्तुपाठ म्हणजे रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास आहे. ज्या रयत शिक्षण संस्थेने त्यांना घडवले, त्या संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी आजवर 135 कोटींहून अधिक रुपयांची मदत केली असून, गुरूनी न मागता सढळ हाताने गुरुदक्षिणा देणारा हा आधुनिक काळातील 'एकलव्य' आहे. अवघ्या 200 रुपये पगारावर शिक्षक म्हणून आपली कारकीर्द सुरू करणाऱ्या रामशेठजींनी आपल्या आयुष्याची सर्व पुंजी समाजाला सुशिक्षित करण्यासाठी आणि उत्तम शैक्षणिक संस्था उभ्या करण्यासाठी खर्च केली, हे शिक्षणाचे मोठे पुण्यकर्म आहे.

त्यांच्या व्यावसायिक जिद्दीचे कौतुक करताना मुख्यमंत्री म्हणाले की, घरचे दागिने गहाण ठेवून आणि 10 हजार रुपयांच्या पहिल्या कंत्राटातून व्यवसायाची सुरुवात करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाने भूमिपुत्रही मोठे कंत्राटदार होऊ शकतात, हे आपल्या जिद्दीने सिद्ध केले. सत्तेच्या राजकारणात असतानाही वयाच्या 52 व्या वर्षी स्वेच्छेने निवडणूक राजकारणातून निवृत्ती घेण्याचा त्यांचा निर्णय हा राजकीय नि:स्पृहतेचे मोठे लक्षण आहे. दि.बा.पाटलांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्रांच्या हक्कासाठी त्यांनी दिलेला लढा ऐतिहासिक असून, नवी मुंबई व रायगडचा विकास 'मुंबईपेक्षाही सुंदर शहर' म्हणून करण्याचे सरकारचे ध्येय आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी शेवटी रामशेठ ठाकूर दांपत्याला दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

रामशेठ ठाकूर म्हणजे विकासाचे कणखर नेतृत्व असल्याचे सांगत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल कौतुकास्पद भाष्य करताना म्हणाले की, "लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ उद्योजक नसून भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लढणारे आणि विकासाला गती देणारे कणखर नेतृत्व आहेत," अशा शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचा गौरव केला1995 च्या काळात कंत्राटदारांनी अर्धवट सोडलेली मुंबई-पुणे एक्सप्रेसवे आणि उड्डाणपुलांची कामे रामशेठ ठाकूर यांच्या धाडसी सहकार्यामुळेच पूर्ण होऊ शकली, अशी आठवण त्यांनी यावेळी सांगितली.

रामशेठ ठाकूर म्हणजे विकासाचे कणखर नेतृत्व असल्याचे सांगत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल कौतुकास्पद भाष्य करताना म्हणाले की, "लोकनेते रामशेठ ठाकूर हे केवळ उद्योजक नसून भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लढणारे आणि विकासाला गती देणारे कणखर नेतृत्व आहेत," अशा शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचा गौरव केला1995 च्या काळात कंत्राटदारांनी अर्धवट सोडलेली मुंबई-पुणे एक्सप्रेसवे आणि उड्डाणपुलांची कामे रामशेठ ठाकूर यांच्या धाडसी सहकार्यामुळेच पूर्ण होऊ शकली, अशी आठवण त्यांनी यावेळी सांगितली.

श्री.गडकरी पुढे म्हणाले की, रामशेठ ठाकूर यांनी जेएनपीटी आणि सिडकोच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना रोजगार मिळवून देण्यासाठी मोठा संघर्ष केला. विकासाची फळे स्थानिक माणसापर्यंत पोहोचली पाहिजेत, हा त्यांचा विचार मोलाचा आहे. वयाच्या ५२ व्या वर्षीच सत्तेच्या राजकारणातून निवृत्ती घेऊन केवळ समाजकार्यात स्वतःला झोकून देणे हे आजच्या नेत्यांसाठी आदर्श उदाहरण आहे. 'इलेक्ट्रिक करंट'प्रमाणे ओढ असलेल्या सत्तेचा त्याग करून त्यांनी जनसेवेचे व्रत स्वीकारले, असे म्हणत गडकरींनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. नवी मुंबई आणि रायगडच्या सर्वांगीण प्रगतीत रामशेठ ठाकूर यांची दूरदृष्टी महत्त्वाची ठरली असून त्यांना उदंड आयुष्य लाभो, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

आपल्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळयात कृतज्ञता व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले की, आजवरच्या 75 वर्षांच्या प्रवासात गाढवावरून माती वाहण्यापासून ते यशस्वी उद्योजक आणि राजकारणी होण्यापर्यंत अनेक खाचखळगे त्यांनी अनुभवले आहेत. मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि जनतेने दिलेल्या उदंड प्रेमामुळेच आपले जीवन यशस्वी झाले असून, हे प्रेमच आपल्याला समाजकार्यासाठी ऊर्जा देते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. 81 आणि 84 च्या आंदोलनातील संघर्षाची आठवण करून देताना त्यांनी भूमिपुत्रांच्या हक्कासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. तसेच, नवी मुंबई आणि उलवे परिसरातील गावठाण विस्तार व पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री सकारात्मक असून प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या मुलांनी समाजकार्याचा वारसा समर्थपणे स्वीकारल्याचा आनंद व्यक्त करत, पुढील 10 ते 20 वर्षे जनतेची सेवा करण्यासाठी आपण सज्ज आहोत, असे त्यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष तथा आमदार महेश बालदी यांनी प्रास्ताविक भाषणात रामशेठ ठाकूर यांच्या राजयकीय कारकिर्दीबाद्दल माहिती दिली. यावेळी रामशेठ ठाकूर यांचा वैयक्तीक आणि राजकीय कार्यकाळाची चित्रफीत सदर करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, पुष्पगुच्छ आणि चाफ्याच्या फुलांची परडी आणि सन्मान चिन्ह देऊन रामशेठ ठाकूर यांचे सपत्निक अभिष्ठचिंतन करण्यात आले. यावेळी रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आणि राजकीय कार्यकाळावर प्रकाश टाकणारा रामपर्व या ग्रंथाचे अनावरण आणि प्रकाशन करण्यात आले. अशाप्रकारे 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल'चे दिमाखदार उद्घाटन, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा संपन्न

## ज्ञानविकास विद्यालयात 'बुधभूषणम्' ग्रंथाचे सामूहिक वाचन

### छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांचा वैचारिक जागर

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी एक प्रेरणादायी उपक्रम राबविला . छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यासोबतच त्यांच्या विद्वत्तेचा वारसा जपण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांनी स्वतः लिहिलेल्या 'बुधभूषणम्' या ग्रंथासह विविध महामानव, क्रांतिकारक आणि समाजसुधारकांच्या साहित्याचे सामूहिक वाचन केले.



नवीन पिढीला गौरवशाली इतिहास माहीत व्हावा आणि थोर महापुरुषांच्या विचारांची रुजवणूक व्हावी, या हेतूने या ग्रंथ वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी 'बुधभूषणम्' या अजरामर ग्रंथासोबतच महामाता, क्रांतिकारक, संत आणि समाजसुधारकांच्या कार्याची माहिती देणाऱ्या साहित्याचे वाचन करून महापुरुषांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्प केला.

या उपक्रमाच्या नियोजनासाठी विद्यार्थ्यांनी विशेष पुढाकार घेतला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष युवराज राऊत, उपाध्यक्ष यश अक्कर यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी गणेश ठोंबरे, संदीप देशमुख, दादाराव श्रीनाते, कचरू काकडे यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल तालुका पोल्सी ठाण्यात शांतता कमिटी व पोलिस पाटील बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी सदस्य व पोलीस पाटील यांची मासिक बैठक वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.या बैठकीमध्ये आगामी सण - उत्सव अनुषंगाने सुरक्षेच्या दृष्टीने योग्य त्या सुचना मार्गदर्शन, बालविवाह रोखण्यासाठी पोलीस ठाण्यात माहिती देण्याबाबत सूचना केल्या आहेत. तसेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याबाबत माहिती,



नशा मुक्ती, सायबर क्राईम, मार्गदर्शन केले आहे, गावातील अडीअडचणीवर चर्चा करून गावातील ज्येष्ठ नागरिक ,महिला , मुले यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने माहिती दिली आहे. गावातील व परिसरातील संशयित वस्तू ,वाहने , इसम तसेच अवैद्य धंद्यांची माहिती देणे, भाडेकरूंची माहिती देणे व CCTV बसविणे बाबत सोसायटी पदाधिकारी यांना माहिती देणे, हेल्पलाइन नंबर - डायल 112, सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर - 1930, 1945 . कोस्टल गार्ड हेल्पलाइन नंबर- 1093, पोलीस बतावणे बाबत जनजागृती करणे, एखादे व्यक्ती/ कुटुंब यांना सामाजिक बहिष्कार करणे, वाढीत टाकने असा प्रकार हद्दीत होणार नाही याची दक्षता घेणे. व होत असल्यास तात्काळ पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, ग्रामीण भागातील नवतरुण मुलं मुले पोलीस खात्यात भरती होण्याकरता मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 2026 मध्ये केळवणे गाव येथील मुलगी तन्मई रोहिदास पाटील ही नवी मुंबई पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाल्याने त्यांचे आई, वडील व त्यांचे पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिलेल्या आहेत . या बैठकीला 50 शांतता कमिटी सदस्य आणि पोलीस पाटील उपस्थित होते.

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४२ ■ शुक्रवार, १५ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


















































# " सुधारित पेंशन योजना " नावाखाली विम्याची पॉलिसी जबरदस्तीने माथी मारण्याचे षडयंत्र? कर्मचाऱ्यांत वाढला संभ्रम

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र शासनाने ६ मे २०२६ रोजी जाहीर केलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (Revised National Pension System – RNPS) ही पहिल्या दृष्टीक्षेपात सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारी योजना वाटते परंतु वास्तव खूप वेगळा आहे. "शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के पेन्शन" ही घोषणा स्वाभाविकपणे आकर्षक आहे. कारण २००५ नंतर सेवेत आलेल्या लाखो कर्मचाऱ्यांनी गेल्या दोन दशकांपासून राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) मधील असुरक्षिततेचा अनुभव घेतला आहे. बाजाराच्या चढउतारांवर आधारित निवृत्ती, निश्चित पेन्शनचा अभाव, स्वतःच्या पगारातून होणारी १० टक्के कपात आणि वृद्धापकाळातील आर्थिक अनिश्चितता यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर शासनाने सुधारित योजना जाहीर केली; परंतु या योजनेचा बारकाईने अभ्यास केल्यास ती "जुनी पेन्शन योजना" नसून "नव्या बाटलीतील जुनीच औषधी " असल्याची भावना मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांमध्ये दिसून येत आहे. वरकरणी हमी पेन्शनचा दिलासा असला, तरी त्यामागील आर्थिक रचना, जाचक अटी आणि कर्मचाऱ्यांच्या बचतीवरील नियंत्रणाचा प्रश्न आता अधिक गंभीरपणे समोर येत आहे.

"५० टक्के पेन्शन" या घोषणेमुळे कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाल्याचे चित्र निर्माण झाले असले, तरी प्रत्यक्ष वास्तव वेगळे आहे. शासनाच्या निर्णयानुसार सलग २० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के इतकी पेन्शन देण्यात येणार आहे. मात्र ही संपूर्ण रक्कम शासन स्वतःच्या निधीतून देत नाही. निवृत्तीच्या वेळी राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) खात्यातील ६० टक्के एकरकमी रक्कम शासनाकडे जमा करावी लागणार असून उर्वरित ४० टक्के निधीतून वार्षिकी (Annuity) खरेदी करणे बंधनकारक आहे. वार्षिकी" म्हणजे निवृत्तीवेतनाच्या संदर्भात एकरकमी रक्कम विमा कंपनीकडे जमा करून त्याबदल्यात दरमहा किंवा ठराविक कालावधीनंतर मिळणारे नियमित उत्पन्न होय. त्या वार्षिकी (Annuity) मधून मिळणारी रक्कम शासन देत असलेल्या पेन्शनमधून वजा केली जाणार आहे. त्यामुळे "५० टक्के पेन्शन" ही पूर्ण सरकारी हमी नसून कर्मचाऱ्यांच्या स्वतःच्या बचतीचे पुनर्वाटप असल्याची टीका होत आहे. यामुळे शासन खरोखर सामाजिक सुरक्षा वाढवत आहे की कर्मचाऱ्यांच्याच पैशातून पेन्शनची नवी व्यवस्था निर्माण करत आहे, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) योजनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कर्मचाऱ्याच्या निवृत्ती निधीवर त्याचे स्वतःचे स्वामित्व असते. कर्मचारी आपल्या बचतीचे नियोजन करू शकतो. त्याला आर्थिक स्वायत्ततेची काही प्रमाणात हमी मिळते. मात्र सुधारित निवृत्तीवेतन योजनेमुळे ही स्वायत्तता कमी होत असल्याची भावना कर्मचारी वर्गात निर्माण झाली आहे. नव्या व्यवस्थेनुसार निवृत्तीच्या वेळी राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) खात्यातील ६० टक्के एकरकमी रक्कम शासनाकडे जमा करावी लागणार आहे. म्हणजे आयुष्यभराच्या कष्टातून जमा झालेल्या निधीवर अंतिम नियंत्रण शासनाचे राहणार, अशी परिस्थिती निर्माण होत आहे.

या निधीचे पुढे काय होणार, तो कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा होणार आणि त्याचा उपयोग कशासाठी केला जाणार, याबाबत शासन निर्णयात स्पष्टता नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम आणि अस्वस्थता वाढली आहे. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, कर्मचाऱ्याचा तसेच त्याच्या पती किंवा पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर शासनाकडे जमा झालेल्या ६० टक्के निधीचे काय होणार? तो निधी वारसांना परत मिळणार की, कायम शासनाकडेच राहणार? याबाबत कोणतेही स्पष्ट धोरण समोर आलेले नाही. त्यामुळे ही योजना सामाजिक सुरक्षेपेक्षा कर्मचाऱ्यांच्या बचतीवरील नियंत्रण वाढवणारी ठरत असल्याची टीका केली जात आहे.

"निश्चित पेन्शन"च्या नावाखाली सुधारित योजनेचा प्रचार केला जात असला, तरी त्यासाठी कर्मचाऱ्यांना स्वतःच्या बचतीवरील नियंत्रण कमी करावे लागत आहे. म्हणजेच सुरक्षिततेची हमी देताना आर्थिक स्वातंत्र्यावर निर्बंध आणले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. कर्मचारी आज प्रश्न विचारत आहेत की, जर योजना इतकीच फायदेशीर असेल तर पगारातून होणारी १० टक्के कपात का सुरू ठेवली जाते? जुनी पेन्शन योजना (Old Pension Scheme-OPS) मध्ये कोणतीही कर्मचारी कपात नव्हती, कर्मचार्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची होती. परंतु आता कर्मचारी स्वतः पैसे भरतात, शासन तो निधी बाजारात गुंतवते आणि भविष्यात नुकसान झाल्यास त्याचा परिणाम पुन्हा कर्मचाऱ्यांवरच होतो. त्यामुळे ही व्यवस्था खरोखर सामाजिक सुरक्षा आहे की, आर्थिक जोखीम कर्मचाऱ्यांवर टाकण्याची पद्धत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आमच्या बचतीची गुंतवणूक आम्हीच का करू नये? आणि जुनी पेन्शन योजना (Old Pension Scheme-OPS) लागू करण्यास शासन का टाळाटाळ करते? हे प्रश्न आता शासनावरील विश्वासाशी जोडले जात आहेत.

सुधारित निवृत्तीवेतन योजना सर्व कर्मचाऱ्यांसाठी समान लाभदायक ठरेलच असे नाही. कमी सेवा कालावधी किंवा कमी वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हमी पेन्शन काही प्रमाणात फायदेशीर वाटू शकते; मात्र दीर्घ सेवा आणि उच्च वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी ही योजना तुलनेने कमी लाभदायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारण अशा कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीचा संचित निधी National Pension System (NPS) corpus मोठा असल्याने बाजारातून मिळणारा परतावा अधिक फायदेशीर ठरू शकतो. त्यांनी स्वतंत्र गुंतवणूक केली तर असे काही अर्थ तज्ज्ञ म्हणतात, दीर्घकालीन आर्थिक लाभ अधिक मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे "एकच योजना सर्वांसाठी" ही भूमिका वास्तववादी ठरत नाही.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (Revised National Pension System – RNPS) मध्ये राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) योजनेतील अनेक जाचक अटीही कायम आहेत. १० वर्षांपेक्षा कमी सेवा असल्यास पेन्शन मिळत नाही. १० ते २० वर्षांच्या सेवेसाठी प्रमाणशीर कमी पेन्शन देण्यात येते. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) मधून आधी रक्कम काढली असल्यास ती १० टक्के व्याजासह परत करावी लागते. कुटुंब पेन्शन केवळ ६० टक्के मर्यादित आहे. कंत्राटी व अनियमित कर्मचाऱ्यांविषयी स्पष्ट धोरण नाही. सोबतच पगारातून १० टक्के कपातही सुरूच राहणार आहे. म्हणजे योजना बदलली असली, तरी तिची मूलभूत जाचक रचना कायम राहिली आहे.

शासनाच्या दृष्टीने ही योजना पूर्ण जुनी पेन्शन योजना (Old Pension Scheme-OPS) नाही आणि पूर्ण राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) ही नाही" तर सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (Revised National Pension System – RNPS) असा मध्यम मार्ग वाटतो. जुनी पेन्शन योजना (Old Pension Scheme-OPS) लागू केल्यास आर्थिक भार वाढेल, तर राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) विरोधातील आंदोलनही तीव्र होते. त्यामुळे शासनाने तडजोडीचा मार्ग स्वीकारल्याचे दिसते. मात्र या प्रक्रियेत शासन स्वतःचा आर्थिक भार कमी करत असून कर्मचाऱ्यांच्या निधीचा वापर करून "हमी पेन्शन"ची प्रतिमा निर्माण करत असल्याची टीका होत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे या योजनेतील आर्थिक गणित, निधीचा वापर आणि भविष्यातील जबाबदाऱ्या याबाबत अद्याप स्पष्ट पारदर्शकता दिसून येत नाही.

सुधारित निवृत्तीवेतन योजनेबाबत कर्मचाऱ्यांच्या मनात अनेक मूलभूत प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. प्रत्यक्षात किती पेन्शन मिळेल, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) ही नाही" तर सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (Revised National Pension System – RNPS) मधील दीर्घकालीन आर्थिक तुलना काय असेल, शासनाकडे जमा होणाऱ्या निधीचे भवितव्य काय आणि वारसांना नेमका किती लाभ मिळणार, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. तसेच भविष्यात शासन नियमांमध्ये बदल करणार नाही, याची कोणतीही ठोस हमीही दिलेली नाही. त्यामुळे कर्मचारी योग्य आणि विश्वासार्ह निर्णय घेण्याच्या स्थितीत शासन नाहीत.

कर्मचारी संघटनांमध्ये सध्या "दारू जुनीच, बाटली नवीन" हे वाक्य मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. म्हणजेच राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली National Pension System (NPS) ची मूलभूत रचना कायम ठेवून त्यावर "हमी पेन्शन"चे आकर्षक आवरण चढवण्यात आल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जर शासनाला खरोखरच कर्मचाऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेची चिंता असेल, तर २००५ पूर्वीप्रमाणे विनाअट जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करण्यास अडचण काय, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित केला जात आहे.एकंदरीत सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना कर्मचाऱ्यांसाठी काही प्रमाणात आर्थिक सुरक्षिततेची हमी देत असली, तरी तिच्यामध्ये अनेक अनुत्तरित प्रश्न, जाचक अटी आणि बचतीवरील नियंत्रण कमी होण्याची भीती दडलेली आहे. "हमी पेन्शन"च्या घोषणेमागे कर्मचाऱ्यांच्याच निधीचा वापर होत असल्याने शासनावरील विश्वासाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पारदर्शकतेचा अभाव, वारसांच्या हक्कांबाबतची अस्पष्टता आणि दीर्घकालीन आर्थिक परिणाम यामुळे कर्मचारी वर्ग अजूनही साशंक आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांची मुख्य मागणी आजही कायम आहे की, २००५ नंतरच्या सर्व कर्मचाऱ्यांना कोणतीही कपात किंवा अट न ठेवता जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करण्यात यावी, जेणेकरून त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने वृद्धापकाळ जगता येईल.

विम्याच्या कोणत्या पॉलिसी घ्यायच्या, कोणत्या कंपनीच्या घ्यायचा हा अधिकार आधी कर्मचाऱ्यांना होता तो हिसकावून जबरदस्तीने ठराविक कंपनीची पॉलिसी माथी मारल्याचे दिसत आहे. यातील निवृत्ती धारक निधन पावला तर काय? नेमके महिन्याला किती पैसे मिळणार? अशा साध्य प्रश्नाची तरी सरकारने स्पष्ट उत्तरे द्यावीत ही अपेक्षा.

**डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**9326877749**



# पनवेल पुरवठा अधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल पुरवठा अधिकाऱ्यांच्या कामाबाबत अनेक तक्रारी येत असल्यामुळे त्यांची बदली करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव आदित्य जानोरकर यांनी कोकण आयुक्त यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.पनवेल येथील पुरवठा अधिकारी या बऱ्याचदा कार्यालयात वेळेवर हजर नसतात तसेच त्या तहसीलदार यांना न सांगता कुठे निघून जातात याची चौकशी करणे गरजेचे असल्याचे जानोरकर यांनी म्हटले आहे. अनेक रेशन दुकानात भ्रष्टाचार सुरू असताना रेशन दुकानांची तपासणी केली जात नाही. तसेच पुरवठा अधिकारी या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसोबत व्यवस्थित बोलत नाहीत आणि त्यांना बसायला जागा देत नाहीत. येथील पुरवठा कार्यालयात खाजगी माणसे काम करतात. त्यांना पगार कोण करतो. तसेच एजंट देखील अनेकदा येजा करतात. शिवभोजन थाळी केंद्राचे मानधन पाठवण्यास देखील जाणून बुजून उशीर केला जात असल्याचे जानोरकर यांचे म्हणणे आहे. गोरगरीब आदिवासी बांधवांना देखील धान्यापासून वंचित राहावे लागत आहे. पनवेल तालुक्यात १९९ रेशनिंगची दुकाने आहेत. यातील अनेक दुकानात भावफलक आणि साठा फलक लावलेला नसतो. तसेच प्राधान्य आणि अंत्योदय लाभार्थ्यांची यादी दुकानात ठेवलेली नसते. धान्याचे नमुने, साठा रजिस्टर, विक्री बुक नसतो. रेशन बुक आणि तक्रार बुक देखील नसते. दुकान उघडण्याची आणि बंद करण्याची वेळ दर्शवणारा फलक नसतो. तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक आणि हेल्पलाइन क्रमांक नमूद केलेले फलक नसतात. असे असताना देखील पुरवठा अधिकारी दुकानांची तपासणी करत नाहीत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करत नाहीत. त्यामुळे त्यांची पनवेल येथून तात्काळ बदली करावी अशी मागणी कोकण आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

**यापूर्वीचे तहसीलदार विजय पाटील यांनी देखील पुरवठा अधिकारी यांना अनेक नोटिसा बजावल्या होत्या तसेच सध्याच्या तहसीलदार यांनी देखील त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.पनवेलच्या पुरवठा अधिकाऱ्यांच्या अनेक तक्रारी येत आहेत. त्या व्यवस्थित काम करत नसल्याचे निदर्शनास येत आहे. शिवणसई-आंबे येथील नागरिकांना चार महिने धान्य मिळालेले नाही. तसेच फेब्रुवारी आणि मार्च धान्य कुठे गायब झाले याची देखील चौकशी होणे गरजेचे आहे. असे अनेक प्रकार पनवेलमध्ये घडत आहेत. त्यामुळे त्यांची बदली होणे आवश्यक आहे.**

**- आदित्य जानोरकर,**
**शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव**

# गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रामदास ठाकूर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर** : गव्हाण-कोपर येथील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि गव्हाण ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रामदास पांडुरंग ठाकूर (वय- ७९) यांचे गुरुवारी (ता. १४) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी २००३ ते २००८ या दरम्यान गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच पद भूषविले होते. ते गव्हाण-कोपर गावचे माजी अध्यक्षही होते.



मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज गव्हाण-कोपरचे चेअरमन भार्गव ठाकूर यांचे ते वडील होत. त्यांच्या अंत्ययात्रेत माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, वसंतशेठ पाटील, लोखंडे सर आणि गव्हाण-कोपर पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत रामदास ठाकूर यांच्या मागे पत्नी, मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## सोमलवाडा / मेंढा येथे पाण्यासाठी हाहाकार

# जलस्त्रोत आटले, टाकी कोरडी; ग्रामपंचायतीच्या उदासीनतेमुळे नागरिकांचे हाल

**दैनिक युवक आधार**

**के रोशनलाल लाखनी** - उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना लाखनी तालुक्यातील सोमलवाडा / मेंढा परिसरात भीषण पाणीटंचाईने नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य केले आहे. गावातील विहिरी, बोअरिंग आणि इतर जलस्त्रोत पूर्णपणे आटल्याने पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिस्थिती इतकी भयावह झाली आहे की, गावातील पाणीपुरवठा टाकीत सुद्धा पाण्याचा थेंब उरलेला नाही.

ग्रामपंचायत प्रशासन मात्र या गंभीर प्रश्नाकडे डोळेझाक करत असल्याचा संताप ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. गावातील महिला, वयोवृद्ध नागरिक आणि लहान मुलांना पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागत असून, उन्हाच्या झळांमध्ये रिकामे हंडे घेऊन फिरण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

विशेषतः वृद्ध महिलांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पाण्यासाठी चढ-उतार करीत दूरवर जावे लागत असल्याने अनेकांना शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. "नळ योजना फक्त कागदावरच आहे का?" असा संतप्त सवाल ग्रामस्थ प्रशासनाला विचारत आहेत.

गावात पाणीपुरवठा यंत्रणा पूर्णपणे कोलमडलेली असताना ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाकडून कोणतीही तातडीची उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी तात्काळ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. "लोकांना पिण्याचे पाणी मिळत नसताना प्रशासन नेमके काय करत आहे?" असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.

दरवर्षी उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याने नागरिकांचा संयम आता संपत चालला आहे. पाणी हा मूलभूत अधिकार असताना नागरिकांना थेंबासाठी भटकंती करावी लागणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना गावात व्यक्त होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीराची प्रभावी अंमलबजावणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : महाराष्ट्राचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार राज्यात गेली दोन महिन्यापासन मंडलस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न होत आहेत. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातही उपविभागीय अधिकारी,प्रांत अनिल दौंडे ,तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या मार्गदर्शनानुसार मंडलस्तरीय शिबीरे आयोजित केली गेली.प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांच्या समस्यापूर्तीसाठी प्रशासनाने केलेली कार्यवाही याबाबत सामाजिक कार्यकर्ते अशोकराव टाव्हरे यांनी मुख्यमंत्री,महसुलमंत्री,महसुल सचिव,विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन पाठवून आभार मानले आहेत.

७ मार्च रोजी कनेरसर येथील शिबिरास टाव्हरे उपस्थित होते. नागरिकांना विविध प्रकारचे दाखले त्वरित दिले जात होते,तक्रारींचे निरसन केले जात होते. खेड तालुक्यातील नागरिकांच्या तक्रारी निवारणार्थ उपविभागीय अधिकारी,प्रांत अनिल दौंडे,तहसीलदार प्रशांत बेडसे,उप अधिक्षक भुमी-अभिलेख नितीन सुर्यवंशी,नायब तहसीलदार रवींद्र मोरे,, चेतन मोरे,राम बीजे,अभिलेख कक्ष प्रमुख निलेश घोडके,सर्व अधिकारी,कर्मचारी यांनी शिबिराच्या माध्यमातून "महसुल प्रशासन आपल्या दारी" ही लोकाभिमुख संकल्पना यशस्वीपणे राबविली आहे.

सध्या फार्मर आयडी शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने काढावे लागत आहे.साबळेवाडी ता.खेड येथील श्री अंबिका देवस्थान ट्रस्टचे मा.अध्यक्ष एकनाथ साबळे व त्यांचे बंधु रायबा साबळे यांचे फार्मर आयडी ॲप्रुव्हल एक महिना झाले नव्हते,याबाबत टाव्हरे यांनि तहसीलदार खेड ,प्रशांत बेडसे यांना माहिती पाठविली असता,त्यांनी तातडीने कार्यवाही करून ॲप्रुव्हल प्रक्रीया पुर्ण केली.

उपविभागीय अधिकारी,अनिल दौंडे हे तालुक्याचे प्रशासकीय प्रमुख आहेत.अपिल सुनावण्या,विविध प्रशासकीय मिटींग,भुसंपादन अधिकारी अशा महत्वपुर्ण जबाबदाऱ्या पार पाडत असतानाही ते समस्या निवारणार्थ मोलाचे मार्गदर्शन करीत असतात. नागरिकांच्या तक्रारींबाबत सकारात्मक दृष्टिकोनातून न्याय देतात याचा अनुभव अनेकदा आल्याचे टाव्हरे यांनी सांगितले आहे.काही वेळा प्रश्न प्रलंबित राहिले तर आंदोलनेही केली,परंतु उपविभागीय अधिकारी,प्रांत अनिल दौंडे साहेब,तहसीलदार प्रशांत बेडसे साहेब यांनी मागण्यांबाबत सकारात्मकता दाखविली.

विविध प्रश्नी महसुलमंत्री बावनकुळे साहेबांना भेटलो असता तत्परतेने दखल घेतात.त्यांचे ओएसडी निलेश शिंगी यांनीही अनेकदा संबधित अधिकारी यांना फोन करून प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले,त्यातून अनेक गोर गरिबांच्या समस्या मार्गी लावता आल्या.उपअधिक्षक भुमी-अभिलेख नितीन सुर्यवंशी,नायब तहसीलदार रवींद्र मोरे,चेतन मोरे,तहसील कार्यालय रेकॉर्ड प्रमुख निलेश घोडके व सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून खेड तालुक्यात तहसीलदार व प्रांत यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभावी कामगिरी केली त्याबद्दल टाव्हरे यांनी पत्राद्वारे आभार मानले आहे.

# जेलची वारीच आयुष्याचा ध्यास! "साहेब, चौकशी कशाला? थेट जेलमध्ये टाका!" – वाशिमच्या सराईत चोराची अजब आणि थरारक कहाणी

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शहरात चोरीच्या घटना अधूनमधून घडत असतात; मात्र चोरी करून स्वतःहून पोलिसांसमोर हसत-खेळत कबुली देणारा आणि "साहेब, आता पटकन मला जेलमध्ये टाका" अशी विनंती करणारा अट्टल गुन्हेगार समोर आल्याने संपूर्ण जिल्ह्यात या अनोख्या चोराची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. संजय बबन खाडे (अंदाजे वय २३ वर्षे, रा. करंजी, ता. मालेगाव) या सराईत चोरट्याची गुन्हेगारी कहाणी सध्या वाशिम शहरात कुतूहलाचा विषय ठरली आहे. चोरी करणे हा जणू त्याचा व्यवसाय आणि जेलमध्ये जाणे ही त्याची जीवनशैलीच बनली आहे. गुन्हा घडवायचा, पोलिसांनी पकडायचे आणि नंतर एखाद्या जुन्या मित्राशी गप्पा माराव्यात तसे हसत-हसत सर्व चोऱ्यांची कबुली द्यायची, ही त्याची विलक्षण सवय पोलीस यंत्रणेलाही चक्रावून सोडणारी आहे.



१४ मे २०२६ च्या मध्यरात्री संजय खाडेने पुन्हा एकदा आपले "हस्तकौशल्य" दाखवून दिले. वाशिम शहरातील रिसोड नाक्यावरील चामुंडा दूध डेअरीचे कुलूप तोडून त्याने तब्बल ५० हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली. एवढ्या मोठ्या रकमेवर डल्ला मारल्यानंतरही त्याचे समाधान झाले नाही. अतिरिक्त कमाईच्या उद्देशाने त्याने स्टेट बँकेसमोरील चौधरी पान सेंटरवर धाड टाकली आणि तेथून १,५०० रुपये चोरले. एका रात्रीत दोन ठिकाणी हात साफ करत त्याने एकूण ५१ हजार ५०० रुपयांवर डल्ला मारला.

संजय खाडे हा असा गुन्हेगार आहे की ज्याला पोलिसांच्या चौकशीची भीती नाही, मारहाणीची चिंता नाही आणि कोर्टाची दहशतही नाही. उलट, पोलीस स्टेशनमध्ये प्रवेश करताना तो इतक्या आत्मीयतेने वावरतो की जणू काही तो आपल्या सासरवाडीतच आला आहे. "कसे आहात साहेब? खूप दिवसांनी भेट झाली!" अशा सहजपणे तो पोलीस अधिकाऱ्यांशी संवाद साधतो. त्याच्यासाठी पोलीस अधिकारी, वकील, न्यायालयीन कर्मचारी आणि जेल कर्मचारी हे आता परके राहिलेले नाहीत. वारंवार होणाऱ्या भेटींमुळे ते जणू त्याच्या परिचयाचा कायमस्वरूपी भाग बनले आहेत.

बहुतेक गुन्हेगार स्वतःचा बचाव करण्यासाठी खोटे बोलतात, पुरावे लपवतात आणि वकिलांची मदत घेतात. मात्र संजय खाडेचा अंदाज पूर्णपणे वेगळाच आहे. अटक होताच तो निर्धास्तपणे म्हणतो, "हो साहेब, कुलूप मीच तोडलं, पैसे मीच घेतले. आता चौकशीवर वेळ घालवू नका; पटकन जेलमध्ये टाका." त्याच्या या निर्भीड कबुलीजबाबामुळे पोलीसही काही काळासाठी अवाक होतात. गुन्हा कबूल करताना चेहऱ्यावर भीतीऐवजी हसू आणि समाधान असणे हीच त्याची सर्वात विलक्षण बाब मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार संजय खाडे अल्पवयीन असतानापासून चोरीच्या गुन्ह्यांत सक्रिय आहे. जेलमध्ये राहणे, शिक्षा भोगणे आणि बाहेर पडताच पुन्हा चोरी करणे हेच त्याच्या जीवनाचे चक्र बनले आहे. जेलमधील सरकारी सोय-सुविधा, नियमित दिनक्रम आणि सुरक्षित वातावरण याची त्याला इतकी सवय झाली आहे की बाहेरील स्वातंत्र्यापेक्षा तुरुंगातील आयुष्यच त्याला अधिक परिचित वाटत असल्याची चर्चा आहे.

वाशिम शहरातील व्यापाऱ्यांमध्ये या घटनेमुळे चिंता वाढली आहे. कारण शिक्षा झाल्यानंतरही तो पुन्हा-पुन्हा गुन्हे करत असल्याने व्यापारी वर्गामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दुसरीकडे, वाशिम शहर पोलिसांसाठीही तो मोठे आव्हान ठरला आहे. गुन्ह्याची भीती, शिक्षा किंवा सामाजिक बदनामी यापैकी कोणत्याही गोष्टीचा त्याच्यावर परिणाम होत नसल्याचे दिसून येत आहे.

"चोरी करणे हा माझा धंदा आहे आणि जेलमध्ये राहणे हे माझे नशीब," या वृत्तीने वावरणाऱ्या या सराईत गुन्हेगाराला कसे सुधरवायचे, हा कायदा आणि समाजासमोरील गंभीर प्रश्न ठरत आहे. वारंवार अटक, शिक्षा आणि जेलवासानंतरही गुन्हेगारीकडे परतण्याची त्याची मानसिकता केवळ पोलिसांसाठीच नव्हे, तर सुधारगृह व्यवस्थेसाठीही चिंतेचा विषय बनली आहे.

ताज्या चोरीच्या प्रकरणात वाशिम शहर पोलिसांनी संजय बबन खाडे याला ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. योगायोग असा की, ज्या ठिकाणी जाण्यासाठी तो स्वतःच उत्सुक असतो, त्या जेलमध्ये पाठवण्याची तयारी पोलीस पुन्हा एकदा करत आहेत.

वाशिममध्ये सध्या एकच चर्चा रंगली आहे— काहींसाठी पंढरीची वारी महत्त्वाची असते; पण संजय खाडेसाठी जेलची वारीच आयुष्याचा खरा उत्सव बनली आहे!

## सिल्लोड पंचायत समितीत धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड येथील पंचायत समिती कार्यालयात धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महाराजांच्या दैदिप्यमान इतिहासाचे स्मरण करत त्यांना त्रिवार वंदन केले.




याप्रसंगी सहाय्यक प्रशासन अधिकारी दिपक गावंडे, कृषी विस्तार अधिकारी जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) केवलसिंग पाटील, वरिष्ठ सहाय्यक राजेंद्र शेळके, कनिष्ठ सहाय्यक बबन पगारे, विठ्ठल गोडसे आणि सुनील गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच गीता धांडे, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) गट समन्वयक केशवकांत बुलबुले, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी अरुण घोलप, बालाजी काथार, वंदना थोरात, लक्ष्मी वानखेडे यांच्यासह कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरी व ग्रामीण भागातील झुडपी जंगलातील अतिक्रमण धारकांना न्याय मिळवून देणे हेच माझे ध्येय – आमदार विनोद अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया शहर तसेच ग्रामीण भागातील वनविभागाच्या झुडपी जंगल क्षेत्रात १९९६ पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमणधारकांना कायमस्वरूपी जमीन मालकी हक्क मिळावेत यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी प्रयत्नांना वेग दिला आहे. यापूर्वी शासनाच्या जागेवर राहणाऱ्या सुमारे ४ हजार २०० हून अधिक ग्रामीण नागरिकांना महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या हस्ते कायमस्वरूपी पट्टे देण्याचा उपक्रम आमदार विनोद अग्रवाल यांच्या संकल्पातून यशस्वी करण्यात आला होता. आता झुडपी जंगल क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या सुमारे १० हजार शहरी व ग्रामीण अतिक्रमणधारकांना न्याय मिळवून देण्याच्या निर्धाराने श्री. अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांना तात्काळ माहिती गोळा करण्याचे आदेश दिले आहेत.




आमदार विनोद अग्रवाल यांनी एसडीओ, तहसीलदार, पंचायत समितीचे बीडीओ, नगरपरिषदचे सीओ, तलाठी व ग्रामसेवकांना निर्देश दिले आहेत की, शहरी तसेच ग्रामीण भागातील झुडपी जंगलाच्या जागेवर १९९६ पूर्वीपासून राहत असलेल्या नागरिकांची माहिती संकलित करून प्रस्ताव तत्काळ वनविभागाकडे सादर करावा. १९९६ पूर्वीचे सर्व अतिक्रमणधारक नियमबद्ध करण्यासाठी अतिशय लवकर कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी सांगितले, "१९९६ पूर्वीच्या झुडपी जंगल जमिनीवरील अतिक्रमणधारकांना न्याय मिळवून देणे हेच माझे ध्येय आहे. एकही व्यक्ती जमीन हक्कांपासून वंचित राहू नये, हा माझा प्रयत्न आहे."

## धाराशिवला दिलासा; लातूर जिल्ह्यातील खरीप 2025-26 पिक विमा अजूनही रखडला

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : धाराशिव जिल्ह्यातील सुमारे चार लाखांहून अधिक शेतकऱ्यांना 336 कोटी रुपयांच्या पिक विमा मंजुरीबाबत सकारात्मक हालचाली सुरू झाल्याची माहिती समोर येत असताना लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये मात्र अजूनही संभ्रम व नाराजीचे वातावरण आहे. खरीप हंगाम 2025-26 संदर्भातील पीक विमा मंजुरी प्रक्रिया अद्याप अंतिम टप्प्यात पोहोचलेली नसून विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी पीक कापणी प्रयोगांवर घेतलेल्या आक्षेपांमुळे संपूर्ण प्रक्रिया रखडल्याची चर्चा सुरू आहे.

लातूर जिल्ह्यात देवणीसह विविध तालुक्यांमध्ये सोयाबीन, उडीद व मूग पिकांचे पीक कापणी प्रयोग कृषी विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहेत. मात्र, पीक कापणी दरम्यान काही ठिकाणी सोयाबीन पीक धान घोळून बाहेर फेकले गेल्याने प्रति हेक्टर उत्पादन कमी आल्याचा आक्षेप विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी तीन जिल्ह्यात 80 मंडळात नोंदविल्याचे कृषी विभागाकडून सांगितले जात आहे. या आक्षेपांमुळे सादर करण्यात आलेल्या अहवालांची पडताळणी आणि मंजुरी प्रक्रिया रखडली असून शेतकऱ्यांना विमा मिळणार की नाही याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

मागील वर्षांमध्ये अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना




'ट्रिगर' तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध होती. मात्र 2025-26 या हंगामात ही सुविधा बंद करण्यात आली असून केवळ पीक कापणी प्रयोगांच्या आकडेवारीवर आधारित विमा मंजूर केला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडे थेट तक्रार नोंदविण्याचा मार्ग बंद झाला आहे. परिणामी, विमा कंपनीने घेतलेल्या आक्षेपांवर शासन किंवा प्रशासकीय स्तरावर निर्णय होईपर्यंत शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे चित्र आहे.

धाराशिव जिल्ह्यात विमा कंपनीचे तांत्रिक आक्षेप राज्यस्तरीय समितीकडून फेटाळल्याची माहिती समोर आल्यानंतर लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीही आपल्या जिल्ह्याचा प्रश्न लोकप्रतिनिधी यांनी तातडीने सोडवावा, . लातूर, धाराशिव व बीड या तीन जिल्ह्यांसाठी एकाच ICICI विमा कंपनीमार्फत योजना राबविण्यात येत असल्याने धाराशिवप्रमाणे लातूर जिल्ह्यातील प्रकरणावरही शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## नागपूर सिटी पोलीसचा अनोखा उपक्रम

### महाकाली नगरातील २१ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ; ४०० नागरिकांच्या उपस्थितीत प्रेरणादायी सोहळा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शैक्षणिक यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर सिटी पोलीसच्या वतीने बेलतरोडी पोलीस ठाणे हद्दीतील महाकाली नगर झोपडपट्टी परिसरात विशेष गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या एकूण २१ विद्यार्थी व विद्यार्थिनींचा यावेळी सन्मान करण्यात आला.

महाकाली नगर परिसरातील बहुतांश कुटुंबे हातमजुरी, मोलमजुरी तसेच घरगुती कामे करून उदरनिर्वाह करतात. अत्यंत मर्यादित आर्थिक साधनसामग्री आणि सामाजिक अडचणी असूनही येथील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून परिसराचा गौरव वाढविला आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजात मानाचे स्थान निर्माण करावे तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींपासून दूर राहून जबाबदार नागरिक बनावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



डॉक्टर रवींद्र कुमार सिंगल तसेच रश्मिता राव एन यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमास डॉक्टर रवींद्र कुमार सिंगल प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याशिवाय अजनी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त, बेलतरोडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सामाजिक कार्यकर्ते अशोक बागुल, सौ. कल्याणी ताई तसेच परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान दहावी व बारावी परीक्षेत यशस्वी ठरलेल्या २१ गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना मा. पोलीस आयुक्त यांच्या हस्ते मोमेंटो आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉक्टर रवींद्र कुमार सिंगल यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्य, शिस्त, मेहनत आणि सकारात्मक विचार यांचे महत्त्व पटवून दिले. भारतातील तरुण वर्ग ही देशाची मोठी ताकद असून विद्यार्थ्यांनी भविष्यात जबाबदार, कर्तव्यदक्ष आणि आदर्श नागरिक बनून समाज व राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान द्यावे, असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले.

मनोगत व्यक्त करताना अशोक बागुल यांनी पोलीस विभागाने झोपडपट्टी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना आयुष्यात सकारात्मक दिशा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास सुमारे ४०० पालक व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थी, पालक आणि पोलीस प्रशासन यांच्यात सकारात्मक संवाद निर्माण होऊन सामाजिक ऐक्य अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले सदर कार्यक्रम पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त, अजनी विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या नेतृत्वात पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोउपनि मुकुंद कवाडे, पोउपनि दिनेश, स्पोउपनि नंदकिशोर ताकडे, पोहवा प्रशांत टककर, फ्रेंड्स ग्रुप सदस्य तसेच महिला कर्मचारी संगिता, प्रेरणा, कुनाल आणि अश्विनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## करंजाडे मध्ये एका रहिवासी इमारतीला आग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेलमधील करंजाडे सेक्टर आर वन येथे आज दुपारी एका रहिवासी इमारतीला भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. दुपारी सुमारे पाऊणे १२ वाजण्याच्या दरम्यान आग लागल्याची माहिती समोर आली असून, ग्राऊंड फ्लोअरवरील दुकानाला प्रथम आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आग लागल्याचे समजताच इमारतीतील नागरिकांनी जीव वाचवण्यासाठी तातडीने बाहेर धाव घेतली. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी टँकरच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीचा आवाका मोठा असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या घटनेत मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, करंजाडे परिसरात स्वतंत्र अग्निशमन केंद्र किंवा अग्निशमन बंब उपलब्ध नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचण्यास वेळ लागत असल्याने नुकसान वाढत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. करंजाडे परिसरासाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी नागरिकांकडून प्रशासनाकडे करण्यात आली आहे.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# खैरीत शनिदेव जयंती उत्सवाची जय्यत तयारी

## १६ मे रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : "|| ॐ शं शनैश्चराय नमः || जय शनि देव ||" या जयघोषात राळेगाव तालुक्यातील खैरी गावात श्री शनिदेव जयंती उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. शनिदेव भक्तगण व समस्त खैरी ग्रामवासी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १६ मे २०२६ रोजी खैरी येथील शनी मंदिर प्रांगणात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण गाव धार्मिक आणि भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाले आहे.



या उत्सवानिमित्त शुक्रवार दिनांक १५ मे रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशीपर्यंत वारकरी भजन मंडळाच्या जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हरिनामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या सुरावटीत संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात रंगून जाणार आहे.

शनिवार दिनांक १६ मे रोजी सकाळी ८:३० ते ११:३० या वेळेत विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. यामध्ये कलश स्थापना, गणपती पूजन, श्री शिव-हनुमंत पूजन, आदित्य शतनामावली सूर्य पूजन, श्री शनेश्वर अभंग स्नान, महापूजा व अभिषेक, मूर्ती सजावट, वस्त्राभूषण तसेच होम-हवन यांचा समावेश आहे. या धार्मिक कार्यक्रमांमुळे मंदिर परिसरात अध्यात्मिक ऊर्जा आणि भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

त्यानंतर सकाळी ११:३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत महाकाल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले असून, किर्तनातून भक्तांना अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. दुपारी ३ वाजल्यापासून महाप्रसाद वितरणास सुरुवात होणार असून, परिसरातील हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

शनिदेव जयंतीनिमित्त मंदिर परिसर आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि धार्मिक वातावरणाने उजळून निघणार असून, खैरी गावासाठी हा उत्सव विशेष आकर्षण ठरणार आहे. श्रद्धा, भक्ती, सामाजिक एकोपा आणि अन्नदानाची परंपरा जपणारा हा धार्मिक सोहळा भाविकांसाठी आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.

कार्यक्रम आयोजकांनी परिसरातील सर्व भाविक भक्तांना उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. तसेच अन्नदानाच्या माध्यमातून सहकार्य करू इच्छिणाऱ्या भाविकांनी १६ मेपूर्वी आयोजकांशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले.

# "दैनिक युवक आधार" च्या बातमीचा इम्पॅक्ट

## धर्माबादमध्ये अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई

### वाळूसह ३ हायवा जप्त ६ जणांवर गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार** : धर्माबाद तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीविरोधात अखेर पोलिसांनी मोठी धडक कारवाई करत वाळूसह ३ हायवा ट्रक जप्त केले आहेत. 'दैनिक युवक आधार'ने अवैध उत्खनन आणि महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबत सातत्याने वृत्त प्रकाशित करून हा विषय लावून धरल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाल्याचे चित्र दिसून येत आहे. या कारवाईत तब्बल ७५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ६ जणांविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


दैनिक
Epaper.YuvakAadhar.In
युवक आधार
संपादक : श्री. संतोष शिवदास आमले
धर्माबाद मध्ये मुरूम माफियांची झाली चांदी, शासनाच्या महसुलाची मात्र वाट लागली !
तालुक्यात मुरूम-माती अवैध उत्खनन जोमात

मिळालेल्या माहितीनुसार, धर्माबाद शहरातील फुलेनगर येथील रहिवासी मारुती रामचंद्र पिटलेवाड याच्यासह इतर पाच जण १२ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ३ हायवा वाहनांमधून १५ ब्रास वाळूची अवैधरित्या वाहतूक करत होते. संबंधित वाळूची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ती नेली जात असल्याची गोपनीय माहिती भोकर अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस उपनिरीक्षक रामदास श्रीमंगले यांना मिळाली होती.

माहितीची खातरजमा होताच पोलीस उपनिरीक्षक श्रीमंगले यांनी विशेष पथकासह धर्माबाद शहरातील बिरसा मुंडा चौकात सापळा रचून संशयित ३ हायवा वाहनांना अडवले. वाहनांची तपासणी केली असता कोणताही वैध परवाना नसलेली आणि बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जाणारी १५ ब्रास वाळू आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत वाळूसह तिन्ही हायवा जप्त केले.

जप्त करण्यात आलेल्या १५ ब्रास वाळूची किंमत अंदाजे ४५ हजार रुपये असून, तिन्ही हायवा वाहनांची किंमत सुमारे ७५ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. अशा प्रकारे एकूण ७५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

या प्रकरणी मुख्य आरोपी मारुती रामचंद्र पिटलेवाड याच्यासह इतर पाच जणांविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या कारवाईमुळे तालुक्यातील वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली असून, अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पुढील तपास पोलीस हवालदार संगेवार हे करीत आहेत.

### महसूल आणि पोलिस प्रशासन आता ॲक्शन मोडमध्ये


**धर्माबाद तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीचे प्रकार वाढले होते. रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात विनापरवाना वाळू वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत होत्या. 'दैनिक युवक आधार'ने या गंभीर प्रश्नावर सातत्याने प्रकाश टाकत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर झालेली ही मोठी कारवाई म्हणजे वृत्तपत्राच्या पाठपुराव्याला मिळालेले यश मानले जात आहे.**

### प्रशासनाचा इशारा

**अवैध वाळू उपसा, वाहतूक किंवा साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असून, नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती तात्काळ पोलिस व महसूल प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# चेतासंस्था चिकित्सकाचे डॉ. जी. एम. टावरी स्मृती व्याख्यानमाला व वार्षिक चिकित्सा बैठक उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राहुल मडावी नागपूर** : न्यूरो सोसायटी असोसिएशन ऑफ फिजिशियन्स तसेच सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवे डॉ. जी. एम. टावरी स्मृती व्याख्यानमाला आणि वार्षिक बैठक अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली .




९ मे रोजी मजासंस्थेने कार्यपद्धतीचा अभ्यास केला आणि शस्त्रक्रिया दरम्यान मज्जासंस्थेचे निरीक्षण करा या विषयावर पूर्वपरिषद कार्यशाळेने कार्यक्रमाची चर्चा सुरू केली. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. लोकेंद्र सिंह यांच्या हस्ते झाले. नागपुरात प्रथमच अशा प्रकारची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत डॉ. निलिमा भालेराव, डॉ. एम. वीर कुमार, डॉ. मार्गी देसाई, डॉ. विश्वनाथ बैरे आणि डॉ. शिल्पा जैस्वाल यांनी प्रात्यक्षिक मार्गदर्शन केले.

या दिवशी मोठ्या प्रतिष्ठेचे डॉ. जी. एम. टावरीमृती व्याख्यान डॉ. रूपहानी यांनी "अभिरंदू दुखापतीतील गुरुसांख्य निर्णय प्रक्रिया : रोग तिकिट आणि गंभिर पैलू" या विषयावर सादर केले. उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहणे म्हणून पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ मेंदू शल्यचिकित्सक डॉ. यशवंत पत्की तसेच ज्येष्ठ मज्जारोगतज्ज्ञ डॉ. जयंत पांडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

स्वर्गीय डॉ. मुकुंद बाहेती यांच्या मजा आरोग्य उपचार अमूल्य योगदानाची कृतज्ञतापूर्वक नोंद करण्यात आली. डॉ. प्रतिभा मुकुंद बाहेती यांनी स्वीकारला. तसेच स्वर्गीय डॉ. जी. एम. टावरी यांच्या पत्नी सौ. पुष्पा जी. टावरी स्वाधीनता विशेष लाभली.

अध्यक्षीय मनोगत डॉ. प्रफुल्ल शेंबाळकर यांनी व्यक्त केले, तर आभार प्रदर्शन डॉ. पवित्र पटनायक यांनी केले.

पू. डॉ. शशांक काळे यांनी शल्यचिकित्सेतील नियम, संरक्षण आणि जीवन वाचविणारे या विषयावर विशेष व्याख्यान दिले.

या विदर्भात विदर्भ आणि मध्य भारत सुमारे २४५ सदस्यांनी नोंदविला. ३६ सर्व मान्यवरांनी विविध विषयांचे मार्गदर्शन केले. वडिल मेंदू शल्यचिकित्सक डॉ. श्याम बाभूळकर लाभही लाभली.

या महिला महिलांसाठी संयुक्त सचिव डॉ.जितेंद्र तडघरे, डॉ. तुषार पाटील, खजिनदार डॉ. नीरज बाहेती तसेच कार्यकारिणी सदस्य डॉ. आलोक उमरेड, डॉ. चेतन राठोड, डॉ. आदित्य अटल, डॉ. पलक जैस्वाल, डॉ. विशाल डाबरे, डॉ. हर्षल राठोड, डॉ. अमरावती, डॉ. अभयकर, डॉ. बनसोड आणि डॉ. विनायक रोडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिवसेना (उबाठा) पक्षाचा देवद पनवेल शाखा वर्धापन दिंन मोठ्या उत्साहत संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : पनवेल तालुक्यातील देवद पनवेल शिवसेना (उद्धव बाळा साहेब ठाकरे) शाखेचा चौथे वर्धापन मोठ्या उत्साहात संपन्न झाला हा दिन म्हणजे मागील वर्ष भरातील कार्यक्रमतील आठवणींना उजाळा देण्याची संधी आणि पुन्हा जपण्याची मिळालेली संधी मागील वर्ष भरातील कार्यक्रम जागतिक महिला दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी , तिथीनुसार शिव जयंती शोभा यात्रा मिरवणूक, दिवाळीत रांगोळी स्पर्धा व किल्ले बांधणी स्पर्धा, १० वी १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सत्कार समारंभ, गणेशोत्सवात आरास देखावे स्पर्धा, आषाढी एकादशीला तुलसी वाटप, नारळी पौर्णिमेला कोळी बांधावा सोबत मिरवणूक कादून नारळ नदीला अर्पण केला जातो. स्व.बाळासाहेब जयंती व स्मृति दिना निमित्त १०० जेष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा , मोफत वह्याचे वाटप, हे उपक्रम राबविले जातात. ग्रामपंचायत निवडणूक, लोकसभा व विधानसभा निवडणुकीत प्रचार करणे. बुथ वरील अनुभव घेता आला. संघटना वाढौसाठी प्रयत्न करणे. वर्षा भरातील कार्यक्रम यशस्वी रित्या पार करण्यासाठी सर्व महिला व



पुरुष शिवसैनिकांच्या सहकार्यामुळे यशस्वी करता आले.पुढील प्रगतीची वाटचाल करीत आहोत. वर्धापन दिनाचे औचित्य साधून उपविभाग प्रमुख जयंत पाखरे यांच्या वाढदिवस साजरा करण्यात आला.मां संपर्क प्रमुख अनिल चव्हाण साहेब, रायगड जिल्हा प्रमुख दिपक निकम, डॉ सेलचे राज्य उपाध्यक्ष डॉ.आशिष बांदेकर, विभाग प्रमुख विशाल भोईर, राज वाघमारे, हेमंत म्हात्रे,शाखा प्रमुख अर्जुन व्हटकर,सुरेश माने, हनुमंत खंडागळे,उपशाखा प्रमुख दिपक दळवी, अँड. राम नाकती,राहुल केणी,विनोद कदम, , सचिन नाचक्की,संजय घाणेकर, सोलकर, नितीन शिंदे, तसेच महिला संघटीका पदाधिकारी , अनेक शिव सैनिक उपस्थित होते .मान्यवरांनी पुढील प्रगती भविष्यातील उद्दिष्टे व वाटचाली करिता शूभेच्छा देण्यात आल्या.

# वर्षानुवर्षे बंद असलेले शेतरस्ते अखेर खुले



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये अनेक वर्षांपासून बंद असलेले शेतरस्ते महसूल प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे अखेर खुले करण्यात आले असून यामुळे सुमारे ३० ते ३५ शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तहसीलदार मनिषा मेने यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम ५ अंतर्गत प्राप्त आदेशानुसार तहसील कार्यालय, सोयगाव यांच्या वतीने जरंडी येथील गट क्रमांक १२३ मधील खातेदार अमरसिंग हिरालाल परदेशी यांचा गेल्या दोन ते तीन वर्षांपासून अडविण्यात आलेला शेतरस्ता मोकळा करण्यात आला. तसेच सोयगाव येथील गोपाल चौधरी व त्र्यंबक चौधरी यांच्या मालकीच्या गट क्रमांक ४० मध्ये जाणारा रस्ताही प्रशासनाने खुला केला.

याशिवाय वेताळवाडी येथील गट क्रमांक ४३ मधील देविदास विष्णू सोनवणे व सिद्धार्थ विष्णू सोनवणे यांच्या शेतात जाण्यासाठीचा मार्ग मोकळा करण्यात आला.धनवट येथील गट क्रमांक ७३/अ मधील मुलचंद झिपरू जाधव यांच्या शेतात जाणारा दोन वर्षांपासून बंद असलेला रस्ताही महसूल प्रशासनाने खुला केला.जरंडी,वेताळवाडी,सोयगाव व धनवट परिसरातील शेतरस्ते खुले झाल्यामुळे शेतकऱ्यांची शेतीकामासाठीची गैरसोय दूर झाली असून वाहतूक सुलभ झाली आहे. प्रशासनाच्या या कारवाईचे परिसरातील शेतकऱ्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. कारवाईदरम्यान नायब तहसीलदार संभाजी देशमुख,मंडळ अधिकारी अरुण पंडीत,मंडळ अधिकारी कल्पना डिघोळे, ग्राम महसूल अधिकारी वैभव जाधव, संतोष राऊत,शिल्पा बोपटे,भगवान सोळुंके तसेच महसूल सेवक संभाजी बोरसे उपस्थित होते. यावेळी संबंधित शेतकऱ्यांनी न्यायालयाचे व महसूल विभागाचे सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# टिळक स्मारकातील गुप्तधन प्रकरणात तीन लाखांची 'सेटलमेंट' फिस्कटली; तपासाचा क्लायमॅक्स रंगतदार टप्प्यावर!

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शहराच्या मध्यवस्तीत उभ्या असलेल्या आणि राजे वाकाटकांच्या कालखंडाचा ऐतिहासिक ठेवा मानल्या जाणाऱ्या 'टिळक स्मारक' या वास्तूमध्ये उलगडत असलेले कथित गुप्तधन प्रकरण आता अक्षरशः एका थरारक चित्रपटाच्या उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचले आहे. गुप्तधनाच्या आमिषाने ऐतिहासिक वास्तूमध्ये बेकायदेशीर उत्खनन, अत्याधुनिक मेटल डिटेक्टरचा वापर, पडद्यामागून सूत्रे हलवणारे पांढरपेशी चेहरे आणि संशयितांना सोडवण्यासाठी झाल्याची चर्चा असलेली तब्बल तीन लाख रुपयांची मांडवली या सर्व घडामोडींमुळे संपूर्ण वाशिम जिल्ह्यात या प्रकरणाची जोरदार चर्चा रंगली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या खळबळजनक माहितीनुसार, या प्रकरणात पकडण्यात आलेल्या सात संशयितांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी सुमारे तीन लाख रुपयांची 'सेटलमेंट' निश्चित झाल्याची चर्चा होती. मात्र, ऐनवेळी समीकरणे बदलली आणि पोलिसांनी कथित प्रस्ताव नाकारत तपास सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. ही भूमिका कायद्याच्या कर्तव्यामुळे घेण्यात आली की पैशांच्या वाटणीवरून अंतर्गत मतभेद निर्माण झाल्याने हा सौदा फिस्कटला, याबाबत शहरात विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. परिणामी, या संपूर्ण प्रकरणाने पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

टिळक स्मारकासारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या वास्तूमध्ये चक्क सुमारे चार फूट खोल खड्डा खणण्यात आल्याचे समोर आले आहे. जमिनीखाली दडलेला धातू अथवा कथित खजिना शोधण्यासाठी आधुनिक मेटल डिटेक्टरचा वापर करण्यात आला. या ठिकाणी संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाड टाकून सात जणांना उपकरणांसह ताब्यात घेतल्याचे समजते.

तथापि, एवढे सर्व पुरावे समोर असतानाही गुन्हा नोंदविण्याच्या प्रक्रियेत विलंब होत असल्याची चर्चा आहे. "वास्तूचा मालक कोण, हे निश्चित करणे आवश्यक आहे," अशा कारणांचा आधार घेत कारवाई लांबवली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे "तपास सुरू आहे की प्रकरण दडपण्याचा प्रयत्न?" असा



सवाल वाशिमकर उपस्थित करीत आहेत.

या प्रकरणात प्रत्यक्ष उत्खनन करणारे काही मजूर किंवा संशयित समोर आले असले तरी खरा कथानक पडद्यामागे लिहिणारे चेहरे अद्याप समोर आलेले नाहीत. उत्खननासाठी वापरण्यात आलेले महागडे मेटल डिटेक्टर पुरवणारा सुवर्णकार कोण, संशयितांना सोडवण्यासाठी मध्यस्थी करणारे कथित प्रतिष्ठित व्यक्ती कोण, आणि या सर्व कारवाईला आर्थिक व सामाजिक पाठबळ कोणी दिले, या प्रश्नांची उत्तरे अद्याप गुलदस्त्यात आहेत.

प्रकरणाचे वाढते गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक नितेश खाटमोडे-पाटील यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालत संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागविल्याची माहिती आहे. त्यांच्या हस्तक्षेपामुळे कथित 'सेटलमेंट'चे प्रयत्न सध्या थंडावल्याची चर्चा असली तरी तळागाळातील काही हालचाली अजूनही संशयाच्या भोवऱ्यात आहेत.

एकीकडे तीन लाखांच्या मांडवलीची चर्चा आणि दुसरीकडे तपासाचा अधिकृत आव — या परस्परविरोधी घडामोडींमुळे खाकीच्या प्रतिमेला धक्का बसल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. वाशिममधील अनेक सामाजिक व ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या नागरिकांनी या प्रकरणातील सर्व सूत्रधारांना उघड करण्याची आणि टिळक स्मारकाच्या विटंबनेबद्दल कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ज्या प्रकरणाची स्क्रिप्ट कथित 'सेटलमेंट'च्या आधारे लिहिली गेल्याची चर्चा आहे, त्याचा शेवट कायद्याच्या विजयाने होणार की आणखी एखाद्या अनपेक्षित वळणाने, याकडे संपूर्ण वाशिम जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

राजे वाकाटकांच्या ऐतिहासिक वारशाचा सन्मान राखत दोषींवर कठोर कारवाई करणे हे आता पोलीस प्रशासनासमोरील सर्वात मोठे आव्हान ठरले आहे.

वाशिमकरांना आता केवळ तपासाचे आश्वासन नको, तर ठोस आणि निर्णायक ॲक्शनची अपेक्षा आहे.

# NEET परीक्षेतील अनियमितता आणि रद्दबातलते विरोधात संविधान चौकात ABVP चे आंदोलन

## विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणणाऱ्या 'शिक्षण माफिया'वर कठोर कारवाई झालीच पाहिजेः ABVP

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** :अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (ABVP) नागपूर महानगर शाखेने, NEET-UG २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी, अनियमितता आणि त्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी आज संविधान चौकात आंदोलन आयोजित केले होते. या आंदोलनात ABVP च्या राष्ट्रीय सचिव कु. पायल किनाके यांची प्रमुख उपस्थिती होती; तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनीही यात सहभाग घेतला.

या आंदोलनाच्या माध्यमातून, ABVP ने परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्याची, तसेच दोषी आढळणाऱ्यांवर शक्य तितकी कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थी परिषदेने स्पष्ट केले की, सुस्त पडलेल्या प्रशासकीय यंत्रणेला जागे करण्यासाठी आणि विद्यार्थी हिताचे रक्षण करण्यासाठी हे आंदोलन एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.




ABVP ची ही ठाम भूमिका आहे की, देशभरातील लाखो विद्यार्थी अनेक वर्षांच्या अथक परिश्रमानंतर आणि संघर्षानंतरच राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये सहभागी होत असतात. अशा परिस्थितीत, पेपरफुटी आणि परीक्षांशी संबंधित अनियमितता या बाबी विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घोर अन्याय करणाऱ्या ठरतात; तसेच त्या संपूर्ण परीक्षा प्रणालीच्या विश्वासार्हतेवर संशयाची गंभीर छाया निर्माण करतात.

ABVP ने अशी मागणी केली आहे की, या संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय तपास यंत्रणांमार्फत निष्पक्ष आणि कालमर्यादेत चौकशी करण्यात यावी. शिवाय, या प्रकरणात सहभागी असलेल्या 'शिक्षण माफिया', गुन्हेगार आणि त्यांच्या साथीदारांवर अत्यंत कठोर शिक्षात्मक कारवाई केली जावी, असाही त्यांनी आग्रह धरला आहे. याव्यतिरिक्त, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी, राष्ट्रीय परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवणे अत्यावश्यक आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (ABVP) राष्ट्रीय सचिव, कु. पायल किनाके यांनी म्हटले:

“देशभरातील लाखो विद्यार्थी ‘NEET’ सारख्या परीक्षांमध्ये सहभागी होण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसत असतात. ‘NTA’ कडून वारंवार होणाऱ्या चुका आणि अनियमिततांचा या विद्यार्थ्यांच्या मनोधैर्यावर व भविष्यावर गंभीर परिणाम होत आहे; शिवाय, यामुळे ‘NTA’ च्या कार्यप्रणालीच्या सचोटीवरही संशयाचे सावट निर्माण झाले आहे. ज्याप्रमाणे देशाच्या सीमांचे रक्षण करण्याची जबाबदारी सैनिकांवर असते, त्याचप्रमाणे देशाचे भविष्य घडवण्याची जबाबदारी देशातील विद्यार्थ्यांवर असते. म्हणूनच, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणे हा देशद्रोहाइतकाच गंभीर गुन्हा मानला गेला पाहिजे आणि अशा कृत्यांसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींना ‘देशद्रोही’च मानले गेले पाहिजे—कारण शिक्षणाच्या पावित्र्याशी कोणतीही तडजोड कदापि स्वीकारली जाणार नाही.

परिणामी, या प्रकरणात दोषी आढळलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही परिस्थितीत, कदापि माफ केले जाऊ नये; तसेच, परीक्षा पद्धतीची तांत्रिक सुरक्षा अधिक बळकट करणे हे अत्यंत अनिवार्य आहे.”ABVP ने पुढे ठामपणे सांगितले की, विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी, परीक्षा पद्धतीचे स्वरूप पारदर्शक ठेवण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विद्यार्थी परिषद आपला लढा अविरतपणे सुरूच ठेवेल.

# परतूर उपविभागाची 'डिजिटल इंडिया'कडे यशस्वी वाटचाल

## महोदरी, इंचा आणि तोरणा गावांत १००% 'स्व-गणना' पूर्ण

**दैनिक युवक आधार**


**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** सरकारच्या 'डिजिटल इंडिया' उपक्रमाप्रती असलेल्या वचनबद्धतेनुसार, माहिती संकलन आणि प्रसारणाची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि सुसूत्रता सुधारण्यासाठी जनगणना २०२७ मध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला जाणार आहे.

भारतीय जनगणनेच्या इतिहासात प्रथमच 'स्व-गणना' (Self-Enumeration) सुविधा सुरू करण्यात आली आहे, ज्यामुळे व्यक्तींना त्यांच्या कुटुंबाच्या जनगणनेचा तपशील स्वतः ऑनलाइन भरण्यास आणि सादर करण्यास सक्षम केले जाईल.

महाराष्ट्र राज्यासाठी, घरयादीच्या कालावधीपूर्वी स्व-गणनेसाठी १५ दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे, जो १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या दरम्यान असेल.

भारत सरकारच्या 'जनगणना २०२७' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या डिजिटल प्रक्रियेत परतूर उपविभागाने ऐतिहासिक यश संपादन केले आहे. उपविभागातील मंठा तालुक्यातील महोदरी व इंचा आणि परतूर तालुक्यातील तोरणा या तीन गावांनी १००% 'स्व-गणना' (Self-Enumeration) पूर्ण करून जिल्ह्यासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

**गावपातळीवरील 'टीम महसूल' व**




**पोलीस पाटलांचे योगदान**

या यशात गावपातळीवरील तलाठी आणि पोलीस पाटील यांची भूमिका अत्यंत कळीची ठरली आहे. शासनाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमात तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी त्यांनी अहोरात्र काम केले.

जनजागृती: तलाठ्यांनी घरोघरी जाऊन 'स्व-गणना' पोर्टलचे महत्त्व पटवून दिले, तर पोलीस पाटलांनी ग्रामसभा आणि स्थानिक बैठकांच्या माध्यमातून ग्रामस्थांना या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

गावपातळीवरील या यंत्रणेच्या सक्रिय सहभागामुळेच ही गावे शंभर टक्के डिजिटल साक्षरतेचे लक्ष्य गाठू शकली आहेत.

**प्रशासकीय यंत्रणेचे नियोजन व जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जालना जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी सूक्ष्म नियोजन केले होते.

जालना जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी या यशाचे कौतुक करताना आवाहन केले आहे की, "जनगणना हे देशाच्या भावी नियोजनाचा पाया आहे. डिजिटल माध्यमाचा वापर केल्यामुळे माहिती अचूक आणि वेगाने संकलित होणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने या उपक्रमाला साथ देत स्वतःहून आपली माहिती नोंदवावी."

**पुढील प्रक्रिया**

ज्या नागरिकांनी आपली स्व-गणना पूर्ण केली आहे, त्यांना एक 'एसई आयडी' (SE ID) प्राप्त झाला आहे.

• *पडताळणी*: १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत जेव्हा प्रगणक घरांना भेट देतील, तेव्हा हा आयडी त्यांना देणे अनिवार्य आहे.

• *प्रमाणीकरण*: प्रगणकाद्वारे माहितीची पडताळणी झाल्यानंतरच ही प्रक्रिया अधिकृतपणे पूर्ण मानली जाईल.

परतूर उपविभागातील इतर गावांनीही या तीन गावांचा आणि तेथील स्थानिक प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा आदर्श घेऊन आपली स्व-गणना विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन उपविभागीय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# अशोक कुमार श्रीवास्तव यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**सचिन पवार माणगांव रायगड** : समाजसेवक, माननीय श्री अशोक कुमार श्रीवास्तव यांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व. सामाजिक प्रेरणा आणि भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी एक प्रशंसनीय मोहीम -भारतीय संस्कृती जगभरात आई-वडील, शिक्षक आणि वडीलधाऱ्यांचा आदर करण्याच्या महान परंपरेसाठी ओळखली जाते. आपल्या धर्मग्रंथांमध्ये आई-वडिलांना दैवी मानले आहे आणि त्यांची सेवा करणे हे सर्वोच्च सद्गुण आणि धर्म मानले जाते.आधुनिक जीवनशैली आणि व्यस्त वेळापत्रकामुळे कौटुंबिक मूल्ये हळूहळू कमी होत असताना, काही महान व्यक्तिमत्त्वे आहेत जी समाजाला त्याच्या संस्कृती, परंपरा आणि कौटुंबिक मूल्यांशी पुन्हा जोडण्यासाठी सतत प्रयत्न करत आहेत. असेच एक प्रेरणास्थान, समाजसेवक आणि सांस्कृतिक जागृतीचे प्रणेते म्हणजे माननीय श्री अशोक कुमार श्रीवास्तव."वृद्ध सेवा नव युवा जन जागृती" या मोहिमेद्वारे, माननीय श्री अशोक कुमार श्रीवास्तव संपूर्ण भारतात वृद्धांची काळजी,आई-वडिलांबद्दल आदर आणि भारतीय संस्कृतीचे जतन याबद्दल जागरूकता निर्माण करत आहेत. त्यांची ही प्रेरणादायी मोहीम केवळ एक सामाजिक कार्यक्रम नसून, भारतीय मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा एक उदात्त संकल्प आहे. ते गावोगाव आणि शहरोशहर फिरून तरुणांमध्ये त्यांच्या आईवडिलांप्रति आणि वडीलधाऱ्यांप्रति आदर, सेवा आणि समर्पणाची भावना जागृत करतात.




त्यांचा विश्वास आहे की, ज्या समाजात आईवडिलांच्या आदराचे रक्षण केले जाते, तो समाज सुसंस्कृत, समृद्ध आणि आध्यात्मिकदृष्ट्या प्रगत बनतो. आपल्या कार्यक्रमांमधून ते तरुणांना हा संदेश देतात की, आई-वडील केवळ जन्म देणारेच नाहीत, तर ते आयुष्यातील पहिले शिक्षक, प्रेरक आणि खरे मार्गदर्शकही आहेत. केवळ त्यांच्या आशीर्वादानेच व्यक्ती खऱ्या अर्थाने यश मिळवू शकते. त्यांच्या आशीर्वादानेच व्यक्तीला जीवनात यश, शांती आणि समृद्धी प्राप्त होते. भारतीय संस्कृती आणि आई-वडिलांप्रती आदराचा संदेश माननीय श्री अशोक कुमार श्रीवास्तव हे 'मातृ देवो भव, पितृ देवो भव' या भारतीय संस्कृतीच्या मूलभूत तत्त्वाचा प्रसार करण्यासाठी कार्यरत आहेत. ते तरुणांना समजावून सांगतात की, आधुनिकता स्वीकारणे चुकीचे नसले तरी, आपली संस्कृती, मूल्ये आणि कौटुंबिक मूल्ये विसरणे समाजासाठी अत्यंत हानिकारक ठरू शकते.ते असे जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात, जे विशेषतः वडीलधाऱ्यांचा आदर करणे, त्यांचे पाय धुणे, फुले अर्पण करणे आणि प्रेरणादायी संवादांवर लक्ष केंद्रित करतात. हे कार्यक्रम तरुणांच्या मनात आई-वडिलांविषयी आणि वडीलधाऱ्यांविषयी आदर, प्रेम आणि सेवेची भावना रुजवतात. जेव्हा तरुण आपल्या आई-वडिलांचा आदर करतात, तेव्हा कुटुंबात आणि समाजात आपोआपच आनंद, शांती आणि नैतिकतेचे वातावरण निर्माण होते.

माननीय श्री अशोक कुमार श्रीवास्तव यांचे हे प्रयत्न आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहेत. ते केवळ समाजाला उपदेशच करत नाहीत, तर स्वावलंबन, समर्पण आणि मूल्यांचे उदाहरणही घालून देतात. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन हजारो तरुण आपल्या आई-वडिलांची सेवा करणे आणि त्यांचा आदर करणे हे आपल्या जीवनातील एक प्रमुख उद्दिष्ट बनवत आहेत.देशव्यापी जनजागृती मोहीम माननीय श्री अशोक कुमार श्रीवास्तव यांनी महाराष्ट्रातील रायगड, आसाम, गुजरात आणि राजस्थानसह अनेक राज्यांमध्ये "वृद्ध सेवा नव युवा जन जागृती" कार्यक्रमांचे यशस्वीपणे आयोजन करून समाजात नवीन जागृती निर्माण केली आहे. मोठ्या संख्येने तरुण, समाजसेवक, शिक्षक, धार्मिक व्यक्ती आणि सामान्य जनतेने त्यांच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन त्यांना भारतीय संस्कृती आणि मूल्यांविषयी जागृत केले आहे.

# तरुणाई शिबिरासाठी कृष्णा कालिंदा आबासाहेब खानसोळे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे लातूर :** येथील युवा कार्यकर्ते कृष्णा कालिंदा आबासाहेब खानसोळे यांची राज्यस्तरीय तरुणाई शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली असल्याने परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे.

तरुणांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये विविध जिल्ह्यांतील निवडक युवक सहभागी होणार आहेत. कृष्णा खानसोळे यांनी शिक्षण, सामाजिक उपक्रम आणि युवक संघटनांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केले आहे.त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, शिक्षक तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# खारपाडा टोलनाकया विरोधात आज मनसेचे आंदोलन

**दैनिक युवक आधार**


**नवीन पनवेल वार्ताहर** : खारपाडा टोलनाकया विरोधात पनवेल मनसे 15 मे रोजी आंदोलन करणार आहे. केलेल्या मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.खारपाडा येथील टोल नाका सुरू होत असून या विरोधात मनसे मैदानात उतरले आहे. मनसेने टोल व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांना लेखी पत्र देत नागरिकांच्या तक्रारीची दखल घेण्याची मागणी केली आहे. टोलनाक्यांवर एम एस 46 आणि एम एच 06 तसेच इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफी लागू करावी अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच स्थानिकांना रोजगार मिळावा अशी देखील मागणी पत्रात करण्यात आली आहे. काही ठिकाणची रस्त्याची कामे अर्धवट आहेत ती पूर्ण करावीत. केलेल्या या मागण्या मान्य न झाल्यास पंधरा मे रोजी सकाळी नऊ वाजता खारपाडा टोल प्लाझा येथे मोठ्या आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती मनसे तालुकाध्यक्ष सुजित सोनवणे यांनी दिली.

# नागपुरात आयुष्मान कार्ड ई-केवायसीसाठी विशेष मोहीम

## १८ मे ते १८ जूनदरम्यान १०० टक्के उद्दिष्टपूर्तीचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड ई-केवायसी शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी नागपूर जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येणार असून ही मोहीम १८ मे ते १८ जून या कालावधीत जिल्हाभरात आयोजित करण्यात येणार आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश नागपूरचे जिल्हाधिकारी Kumar Ashirwad यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील Chhatrapati Shivaji Maharaj Sabhagruh येथे आयोजित ई-केवायसी मोहिमेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती




राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले की, ग्रामीण भागात गावनिहाय तर शहरी भागात वॉर्डनिहाय आयुष्मान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. प्रशासकीय यंत्रणेसोबत लोकसहभागही या मोहिमेच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि Mahatma Jyotirao Phule Jan Arogya Yojana या दोन्ही योजना एकत्रित स्वरूपात राबविण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी प्रति कुटुंब पाच लाख रुपयांपर्यंत देशातील सूचिबद्ध सरकारी अथवा खासगी रुग्णालयांमध्ये उपचाराची सुविधा उपलब्ध आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडे आयुष्मान कार्ड असणे आवश्यक असून त्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षणालाही सुरुवात करण्यात आली आहे. रेशन दुकानदार, ई-केवायसी केंद्र चालक तसेच आशा सेविका यांना प्रशिक्षण दिले जात असून हे प्रशिक्षण १७ मेपर्यंत सुरू राहणार आहे.

तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना गावनिहाय शिबिरे आयोजित करून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आले असून, नागपूर जिल्ह्यातील ही मोहीम आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळातर्फे व्हाटस अॅप चॅटबॉट सेवा सुरू !!

**दैनिक युवक आधार**

**रोहित बारस्कर अकोला :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक तसेच गट कर्ज योजनांतील लाभार्थ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने व्हाटस अॅप चॅटबॉट सेवा सुरू करण्यात आलेली आहे, अशी माहिती महामंडळाचे जिल्हा समन्वयक रोहित बारस्कर यांनी दिली.

लाभार्थ्यांसाठी व्हाटस अॅप चॅटबॉट सेवा सुरू करण्यात आली असून व्हाटस अॅपमध्ये अर्जाची स्थिती, मार्गदर्शन व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर सेवा "एक क्लिक" या संकल्पनेअंतर्गत विकसित करण्यात आली असून, लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जासंबंधित माहिती व विविध प्रक्रियांची स्थिती आता थेट व्हाटस अॅप वरून तत्काळ प्राप्त होणार आहे.

व्हाटस अॅप चॅटबॉट सुविधेद्वारे लाभार्थ्यांना पुढील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत :

८९७६८५५९२१ या क्रमांकावर "Hi" असे लिहिल्यास Menu / पर्याय उपलब्ध होतील. या पर्यायानुसार खाली दिलेले पर्याय समोर येतील. त्यापैकी संबंधित पर्यायाची निवड करून पुढे जावे.

- महामंडळ व योजनांची माहिती.
- नवीन नोंदणी संदर्भातील मार्गदर्शन.
- पात्रता प्रमाणपत्र स्थिती व डाउनलोड सुविधा.
- बँक कर्ज मंजुरी स्थिती.
- व्याज परतावा दावा स्थिती.
- तांत्रिक अडचणी नोंदविणे व त्यासंबंधित Ticket Generation सुविधा.

या सर्व सेवा OTP आधारित सुरक्षित पडताळणी करून लाभार्थ्यांना सुविधा मिळणार आहेत.

स्वयं नोंदणी, बँक मंजुरी व व्याज परतावा दावा करिता मार्गदर्शनासाठी प्रशिक्षण व्हिडिओ WhatsApp Bot मध्ये उपलब्ध असून विभागीय कार्यालय / जिल्हा कार्यालयाची संपर्क माहिती एका क्लिकवर प्राप्त होणार आहे.

सदर प्रणालीमुळे लाभार्थ्यांना कार्यालयीन भेटी कमी होऊन ऑनलाईन सुविधेमुळे अर्ज प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व गतीमानता येईल. शिवाय, लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जाची स्थिती "एकाच चॅटमध्ये उपलब्ध होत असल्याने वेळ व खर्चाची बचत होणार आहे. या सुविधेमुळे लाभार्थ्यांचे अनधिकृत एजंट वरील अवलंबित्व कमी होईल.

महामंडळामार्फत यापूर्वीच लाभार्थ्यांच्या सोयीसाठी अधिकृत मोबाईल अॅपदेखील उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सर्व लाभार्थ्यांनी उपलब्ध डिजिटल सुविधांचा जास्तीत जास्त वापर करून योजनांचा लाभ सुलभ पद्धतीने घ्यावा, यासोबतच अॅपमार्फत सुविधा लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

अधिक सोईसाठी महामंडळाच्या वेब प्रणालीवर लाभार्थ्यांच्या व्यवसाय विस्तारासाठी "व्यवसायवर्धन" टॅब सुरू करण्यात आलेला असून,

लाभार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी त्यांची उत्पादने व सेवा पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने महामंडळाच्या प्रणालीवर प्रसिद्ध करावीत, ज्यामुळे त्यांच्या सेवा व उत्पादनांची माहिती अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचेल. याच माध्यमातून लाभार्थ्यांना विक्री व खरेदीचे व्यासपीठ तयार करण्याची ई मार्केट प्लेसची सुविधा भविष्यात उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळ प्रयत्नशील आहे. यामुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायात वृद्धी होण्यास मदत होईल.

दरम्यान, भविष्यात या माध्यमातूनच अर्ज प्रक्रिया उपलब्ध करून देण्याबाबत महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरू असून, लाभार्थ्यांना अधिक सुलभ व गतिमान सुविधा देण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे.

सर्व लाभार्थ्यांनी व्हाटस अॅप चॅटबॉटचा वापर करून डिजिटल सुविधांचा लाभ घ्यावा.

## छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**देगलूर. तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे :** करडखेड ता.देगलूर येथील छत्रपती संभाजी राजे चौकात संभाजी ब्रिगेड देगलूरच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांची ३६९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.यावेळी डॉ.सुनील जाधव यांनी जिजाऊ वंदना सादर करून मानवंदना दिली.यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित माँ जिजाऊ,शिव व शंभूप्रेमींनी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले.यावेळी सदाशिव पाटील सुगावे,कैलास यसगे,अॅड.अंकुश राजे जाधव,बालाजी जाधव आंदेगाववाडीकर आणि जयदीप वरखिंडे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे,शिवसेना युवासेना जिल्हाध्यक्ष नामदेव पाटील थडके देगावकर,विधानसभा अध्यक्ष देवीदास थडके,तालुकाध्यक्ष शहाजी बाबरे,बालाजी पाटील कुशावाडीकर, बालाजी पाटील



सांगवीकर, रणजीत हिंगोले,राज देशमुख करडखेडकर,डॉ.सुनील जाधव,तंटामुक्ती अध्यक्ष अहमद कुरेशी,बालाजी इबितवार,फैयाज शेख,सुनील शिंदे,राज पाटील शिंदे करडखेडकर यांच्यासह महिला भगिनी व सर्व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच जयदीप वरखिडे,ज्ञानेश्वर बिरादार सर,जानते सर,मिलिंद वाघमारे (कावळगावकर),बालाजी पाटील (अमदापुरकर),मिरज सपनुरे(अमदापूरकर),बीट जमादार सगरोळीकर व त्यांचे सहकारी बंकलवार,नरसिंग महाराज करडखेडवाडी,शैलेश शिंदे,वैभव शिंदे बालाजी इबितदार आदींची उपस्थिती लाभली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुनील जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन जेजेराव पाटील शिंदे यांनी केले.

## रायगड जिल्ह्यातील आमणोली गावाजवळील प्रवासी पुलाचा धक्कादायक पतनकांड : ओव्हरलोड ट्रकमुळे पूल कोसळला

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील आमणोली गावाजवळील प्रमुख प्रवासी पुलावरून क्षमतेपेक्षा जास्त लोड असलेल्या हायवा ट्रकची वाहतूक सुरू असताना पूल कोसळला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, पण खडी वाहणारा ट्रक फसला आणि आमणोलीसह दहिगाव, कोलतरे तसेच आदिवासी वाड्यांचा जांभूळपाड्यापासूनचा संपर्क तुटला. या घटनेमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली असून, प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल जोरदार चर्चा होत आहे.

घटनेचे तपशील आणि ओव्हरलोडिंगचा धोका

जांभूळपाड्यापासून पुढे



आमणोली, दहिगाव, कोलतरे आणि आदिवासी वाड्यांना जोडणारा हा पूल कमकुवत अवस्थेत होता. याच पुलावरून अवजड हायवा ट्रक खडी वाहताना पूर्ण क्षमतेपेक्षा जास्त लोडमुळे संरचना कोसळली. ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी करून ट्रकचालकांना धारेवर धरले. "पावसाळ्यात हा मार्ग बंद झाल्यास विद्यार्थी, रुग्ण आणि सामान्य नागरिकांची गैरसोय होईल," असे ग्रामस्थ बोलत आहेत. मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही हालचाल दिसत नाही.

*RTO अधिकाऱ्यांचे छुपे गटबंधन उघड*!

अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा-मुरुड मार्गावरील नवेदरबेली पूल आणि सहान पाल्हे बायपासवरील नागाव पूल येथेही ओव्हरलोड लोकल ट्रक, डंपर, हायवा आणि १२ चाकी डंपरची खुलेआम वाहतूक होत असते. एका डंपरचालकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले, "महिन्याला प्रत्येक गाडीवाल्याकडून १००० रुपये घेऊन RTO अधिकारी आणि वाहतूक शाखेचे कर्मचारी हे छुपे ग्रुप चालवतात. त्यांच्या पाठिंब्यामुळे अवैध वाहतूक बिनधास्त सुरू आहे." या उघड संगनमतामुळे पुलांची जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. "अचानक पूल कोसळला तर जबाबदारी कोण घेईल? RTO की पोलिस प्रशासन?" अशी जनतेच्या चर्चांना उधाण आले आहे.

*शासनाचे दुर्लक्ष*:

सुमारे ५ वर्षांपासून नवीन पुलाची मागणी!

सार्वजनिक बांधकाम विभाग 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' धोरण अवलंबून असल्याचा आरोप होत आहे. सुमारे पाच वर्षांपासून नवीन पुलाची मागणी असतानाही दुर्लक्ष होत आहे. रायगड जिल्ह्यातील अशा अनेक ठिकाणी ओव्हरलोड वाहतुकीमुळे अपघात होण्याची शक्यता कायम आहे. शासनाने तात्काळ कारवाई करून अवैध वाहतूक रोखावी, नवीन पुल बांधावा अन्यथा मोठा अपघात होईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. RTO आणि जिल्हा प्रशासनाने जबाबदारी घेऊन तपास करावा, अन्यथा जनतेचा रोष वाढेल!

## ' माझं गाव आरोग्य संपन्न 'चा गाजावाजा वास्तव मात्र मुदगलकरांचे भयावह!

**दैनिक युवक आधार**


**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ तालुक्यातील मुदगल हे गाव दुर्गम भागातील गोदावरी नदीच्या काठावरील मात्र संपूर्ण राज्यासह परराज्यात देखील सुप्रसिद्ध हे गाव आहे मुदगल हे गाव दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते परंतु मुदगल पाथरी जोडणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरवस्था या दोन्हीची अवस्था बिकट झाली आहे महाराष्ट्र शासन सध्या ' माझं गाव आरोग्य संपन्न गाव ' या मोहिमेचा मोठ्या प्रमाणावर गाजावाजा करत आहे गावागावांत आरोग्य सुविधा मजबुत झाल्याचे चित्र रंगवले जात आहे मात्र प्रत्यक्ष ग्रामीण वास्तव पाहिले असता ही मोहीम केवळ जाहिरात प्रसिद्ध बॅनर आणि



बैठकीपुरतीच मर्यादित असल्याचे दिसून येत आहे पाथरी तालुक्यातील मुदगल आरोग्य व्यवस्थेची अवस्था जर पाहता ' माझं गाव आरोग्य संपन्न ' तर माझं गाव आरोग्य व्यवस्थेच्या भरोशावर असुरक्षित ' अशी परिस्थिती निर्माण झाल्याची प्रतिक्रिया मुदगलकरातुन व्यक्त होत आहे पाथरी तालुक्यातील मुदगल येथील भव्य दिव्य आरोग्य केंद्राच्या इमारतींचे उद्घाटन गेल्या काही वर्षांपूर्वी मोठ्या थाटामाटात करण्यात आले होते लोकप्रतिनिधी अधिकारी भाषणे फित कापणे फोटोसेशन सर्व काही झाले मात्र त्यानंतर आजपर्यंत या इमारतीत नियमित आरोग्य सेवा सुरू करण्यासाठी आरोग्य प्रशासनाला मुहूर्तच मिळालेला नाही तब्बल द तीन ते चार वर्षेभर उलटूनही इमारतींचे कुलूप उघडले गेले नसल्याने लाखो रुपयांची इमारत धुळखात पडली आहे मुदगल येथील रूग्ण मात्र अजूनही अपुर्ण सुविधांमध्ये उपचार घेत आहेत " यामुळे आता मुदगलकर मनतात ग्रामीण आरोग्याचा कणा ढासळला " आरोग्य उपकेंद्र ही ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची पहिली पायरी मानली जाते तर माझं गाव आरोग्य संपन्न ही संकल्पना प्रत्यक्षात कशी उतरविणार ? असा प्रश्न आता मुदगल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत

## सरस्वती विद्यालय तेलगाव ची यशाची परंपरा कायम







**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** नवगण शिक्षण संस्था राजूरी (न.) ता.जि.बीड संचलित सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तेलगाव येथील एस.एस.सी.बोर्ड परीक्षेत उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवलेली आहे.

फेब्रुवारी/मार्च - २०२६ मध्ये माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) बोर्ड परीक्षा घेण्यात आली. या मध्ये जाधव निकीता रमेश ९२.८४%, लगड ऋतुजा मारुती ९१.४०%, लगड अमृता अंकुश ९१.२०%, लगड आदित्य कैलास ९०.९०%, धुमाळ गायत्री बळीराम ९०.२०%, लगड अक्षरा विठ्ठल ९०.२०% गुण घेऊन यश संपादन केले आहे.

या सर्व गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, सहसचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका ताई क्षीरसागर, संस्थेचे प्रशासक डॉ.व्हि.टी. देशमाने, डॉ.सुधाकर गुट्टे, शालेय समितीचे अध्यक्ष अशोक भाऊ लगड, प्राचार्य चवार बी.एस., पर्यवेक्षक सपाटे सर व सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## डॉ. सतीश किसन सायंबर यांना पद्मपाणी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार 2026 जाहीर

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुलेमान देवळा येथील गणित-विज्ञान शिक्षक डॉ. सतीश किसन सायंबर यांना "पद्मपाणी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार 2026" जाहीर झाला आहे. त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची दखल घेऊन हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

डॉ. सतीश सायंबर यांनी 26 नोव्हेंबर 1996 रोजी आष्टी तालुक्यातील शिराळ येथे शिक्षक म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा व विविध शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली.

यानंतर त्यांची बदली काकडवाडी येथील शाळेत झाली. त्या काळात गुणवत्तेचा "मराठवाडा रमणी पॅटर्न" सुरू होता. या उपक्रमामध्ये त्यांनी आपल्या शाळेला तालुक्यात गुणवत्तेत प्रथम क्रमांक मिळवून दिला. त्यांचा वर्ग "फाईव्ह स्टार वर्ग" म्हणून ओळखला जाऊ लागला. खडकाळ परिसरात असलेल्या शाळेभोवती त्यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून परिसर निसर्गरम्य बनवला. तसेच सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या नारळाच्या झाडांची फळे आजही नागरिक उपभोगत आहेत.



त्यानंतर त्यांची बदली सीना नदीच्या काठावरील साकत या गावी झाली. इयत्ता चौथीपर्यंत असलेल्या या शाळेचा विस्तार करून त्यांनी शाळा आठवीपर्यंत नेली. विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवताना गुणवत्तेमध्येही सातत्याने वाढ केली. विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवून त्यांनी शाळेचे "सहा शिक्षकी शाळेत" रूपांतर घडवून आणले. मुख्याध्यापक म्हणून तब्बल दहा वर्षे जबाबदारी सांभाळताना त्यांनी शाळेला ई-लर्निंगसह डिजिटल शाळेचे स्वरूप दिले. शालेय परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाचे कार्यही केले.

सन 2018 मध्ये ऑनलाईन बदली प्रक्रियेद्वारे त्यांनी स्वतःच्या गावातील शाळेत बदली करून घेतली. त्या ठिकाणी " गट पद्धती" सारखे उपक्रम राबवून मोठ्या वर्गातील विद्यार्थी लहान वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवतील अशी अभिनव संकल्पना अमलात आणली. स्वच्छता, कचरा मुक्त शाळा आणि घनदाट वृक्षसंवर्धन यामुळे संबंधित शाळेला "पीएम श्री स्वच्छ विद्यालय पुरस्कार 2022" प्राप्त झाला.

डॉ. सायंबर हे शाळा सुटल्यानंतरही अप्रगत विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या घरी जादा तास घेऊन मार्गदर्शन करतात. तसेच वंचित व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना सन 2023 मध्ये "बीड जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्यात आला होता.

सन 2024 मध्ये त्यांची दर्जेवाढ होऊन जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुलेमान देवळा येथे गणित-विज्ञान शिक्षक म्हणून बदली झाली. येथेही त्यांनी विविध उपक्रम राबवून शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी उल्लेखनीय कार्य सुरू ठेवले आहे.

डॉ. सतीश सायंबर यांनी 2012 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून मराठी विषयात पीएच. डी. पदवी संपादन केली. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल तत्कालीन राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला होता.

"पद्मपाणी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार 2026" जाहीर झाल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुलेमान देवळा येथील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## श्री.रामेश्वर क्षत्रिय यांचे अल्पशा आजाराने निधन



**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील बोरी येथील रामेश्वर देविदास क्षत्रिय वय 45 यांचे गुरुवार दि. 14 एप्रिल रोजी बोरी येथे अल्पशा आजाराने निधन झाले.रामेश्वर क्षत्रिय हे उत्कृष्ट शेतकरी होते तसेच बोरी विकास सोसायटीचे संचालक म्हणून उत्कृष्ट काम केल होते. त्यांच्यामागे चुलते पत्नी मुलगा मुलगी जावई असा परिवार आहे.

## शिक्षणाची गंभीरता आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग लाखनी ने सिद्ध केले

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी :** नवीन शैक्षणिक धोरणाला अतिशय गंभीरपणे घेऊन, आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी यावर्षीच्या भविष्य समर ट्रेनिंग 2.0 मध्ये एक नवीन ट्रेनिंग चे समावेश केले आहे. ती ट्रेनिंग म्हणजे जापनीज स्पिकिंग ट्रेनिंग. आता आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग फक्त मराठी, हिंदी आणि इंग्लिश बोलण्यापुरताच नाही तर विद्यार्थ्यांना जापनीज बोलायला सुद्धा शिकवणार आहे. आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग च्या भविष्य समर ट्रेनिंग उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये नक्कीच एक नवीन बदल घडून येणार आहे. जापनीज भाषा शिकवणाऱ्या प्रशिक्षिका प्राची मॅम यांनी आर्टस ऑफ लाईफच्या या उद्देशाला साथ दिली त्याबद्दल आर्टस ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी प्राची मॅम चे आभार मानले. सोबतच विद्यार्थी जीवनाला एक वेगळे वळण देऊन प्रत्येक विद्यार्थ्याला घडवण्याचा ध्यास निरंतर राहील असे आश्वासन निहाल सरांनी दिले. श्री निहाल वालदे सर यांच्या या उपक्रमाला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा.

# जालना तालुक्यातील १३ गावांकडून १७३ गाव वॉटर ग्रीडसाठी ₹९,३८,८६५ केला भरणा

## आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडून सरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थांचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नामदेव मंडपे मंठा**

**जालना** : १७३ गाव वॉटर ग्रीड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जालना तालुक्यातील गावांनी जबाबदारीची जाणीव ठेवत बिल भरण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. जालना तालुक्यातील एकूण १३ गावांनी आतापर्यंत ₹९,३८,८६५ रुपयांचा भरणा करून योजनेप्रती सकारात्मक सहभाग नोंदविला आहे.

**१७३ गाव वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत गावनिहाय बिल भरणा रक्कम पुढीलप्रमाणे—**

सावरगाव भागडे ₹२५०००
बीबी ₹४४२८
उमरी ₹१२३००
उमरी तांडा ₹५९०४
शिवनगर ₹१९९६९
कोळवाडी दरेगाव ₹५००००
ढगी ₹३४६४२
सेवली ₹२०००००
बोरगाव आतापर्यंत ₹११८४००
एरंडवडगाव ₹३८२२२
राठोडनगर ₹८००००
काकडा आतापर्यंत ₹३२५०००
शंभू सावरगाव ₹३००००

या उल्लेखनीय प्रतिसादाबद्दल आमदार बबनराव लोणीकर यांनी संबंधित गावांतील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांचे विशेष अभिनंदन केले आहे.

यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, “१७३ गाव वॉटर ग्रीड योजना ही ग्रामीण भागाच्या पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. जालना तालुक्यातील १३ गावांनी पुढाकार घेत तब्बल ₹९ लाखांहून अधिक रकमेचा भरणा करून आदर्श निर्माण केला आहे. संबंधित सर्व सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामस्थांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.”



जालना तालुक्यातील ग्रामपंचायतींकडून १७३ गाव वॉटर ग्रीड योजनेसाठी करण्यात आलेला बिल भरणा हा केवळ आर्थिक व्यवहार नसून ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम आणि अखंडित ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. ग्रामपंचायतींकडून वसूल करण्यात आलेली ही रक्कम वॉटर ग्रीड योजनेच्या विविध प्रलंबित आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. यामध्ये सर्वप्रथम जलसंपदा विभागाकडून वॉटर ग्रीड योजनेसाठी उचलण्यात येणाऱ्या पाण्याबाबतची थकीत देयके अदा करण्यात येणार असून, यामुळे भविष्यात पाणीपुरवठ्यात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही.

तसेच योजनेच्या सुरळीत संचालनासाठी दरमहा मोठ्या प्रमाणात येणाऱ्या वीज वापराच्या थकीत बिलाची रक्कमही या निधीतून भरली जाणार आहे. याशिवाय मुख्य जलवाहिन्या, पंपिंग स्टेशन, मोटार, विद्युत उपकरणे, व्हॉल्व्ह, फिल्टर यंत्रणा तसेच इतर तांत्रिक साधनसामग्रीच्या नियमित देखभाल, दुरुस्ती आणि आपत्कालीन तांत्रिक कामांसाठी लागणारा खर्चही याच निधीतून भागविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी वेळेवर केलेला हा बिल भरणा केवळ देयकांची पूर्तता करण्यापुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना भविष्यात अखंड, सुरक्षित आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध राहण्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा लोकसहभाग असल्याचे मानले जात आहे.

तसेच उर्वरित गावांनीही या योजनेत सक्रिय सहभाग नोंदवत बिल भरणा करून गावाच्या विकासात हातभार लावावा, असे आवाहनही आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

## सिल्लोडमध्ये उद्या श्री शनेश्वर जन्मोत्सव सोहळा

### अजबसिंह महाराज मिरगे यांचे होणार 'काल्याचे कीर्तन'

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड शहरातील शिवाजीनगर भागातील रामकृष्ण विद्यालय परिसरात उद्या शनिवार (ता. १६) रोजी श्री शनेश्वर जन्मोत्सवाचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात रुद्र अभिषेक, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे.

या महोत्सवात ह.भ.प. अजबसिंह महाराज मिरगे यांचे सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत 'काल्याचे कीर्तन' होणार आहे.

त्यानंतर दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे.

शनेश्वर जन्मोत्सवानिमित्त आयोजित या भक्तीमय सोहळ्याचा व महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन १००८ महामंडलेश्वर सदाशिव शास्त्री रामचंद्र जोशी मंगरूळकर यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजी महाराज जयंती दिग्रस शहरात उत्साहात साजरी

## बहुजनांच्या हक्कासाठी लढलेले स्वराज्याचे दुसरे छत्रपती

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** छत्रपती संभाजी महाराज वयाच्या १४ व्या वर्षी "बुधभूषण" आणि त्या नंतर "सातसतक,नायिकाभेद, नखशीख" सारखे प्रचंड साहित्य निर्माण करणारे साहित्यिक,रणधुरंधर, स्वतंत्रवीर, प्रजाहितदक्ष ,अष्टपैलू छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दिग्रस शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विविध सामाजिक संघटना, युवक मंडळे व नागरिकांच्या वतीने संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.छत्रपती संभाजी महाराजांनी अत्यंत कठीण परिस्थितीत स्वराज्य टिकवण्यासाठी संघर्ष केला. संकटांना न घाबरता त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी अखेरपर्यंत लढा दिला. त्यांचे जीवन हे युवकांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांमधून समाजात स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण झाली असुन स्वराज्य टिकवण्यासाठी त्यांनी सर्व समाजातील मावळे,



सैनिक आणि सामान्य जनतेला एकत्र घेऊन काम केले.

शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य प्रजेला संरक्षण देण्यावर भर दिला.

अन्याय करणाऱ्या सरदारांवर कठोर कारवाई करून सामान्य लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.मराठी भाषा, संस्कृती आणि स्वाभिमान जपण्यासाठी कार्य केले. युद्धकाळातही प्रजेवर अन्याय होऊ नये याची काळजी घेतली. विविध समाजघटकांना सैन्य आणि प्रशासनात संधी दिली.स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःचे जीवन अर्पण करून जनतेमध्ये स्वाभिमान आणि संघर्षाची प्रेरणा निर्माण केली.

ज्ञान, शौर्य आणि नेतृत्व यांच्या बळावर बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण केला.छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा इतिहास प्रत्येक तरुणाच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवत राहील,असा निर्धार यावेळी अमर नरोडे सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने व्यक्त करण्यात आले या वेळी प्रशांत गौरकर, संतोष वाघमारे, रवि कदम, संकेत दातीर, अमोल दुधे, बाबु ढाले, अन्ना बेंद्रे, राष्ट्रिय आदिवासी एकता परिषद चे जिल्हा अध्यक्ष व राष्ट्रिय आदिवासी छात्र संगठन चे प्रदेश अध्यक्ष गजानन गंडाळे व इत्यादि समाज बांधव उपस्थित होते

## सूर्यनारायण कोपला; काळजी घ्या

राज्यात सूर्य नारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. सध्या राज्यात प्रचंड उकाडा जाणवत असुन जवळपास सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या पुढे गेले आहे. मागील आठवड्यापासून तर राज्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण राज्य उकाड्याने हैराण झाले आहे. या महिन्याअखेर राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल असा अंदाज आहे. यावर्षी उन्हाळा कडक असेल असा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. मागील महिन्यात म्हणजे एप्रिल महिन्यातच याची चाहूल लागली होती गेल्या महिन्यातही सर्वच शहरांचे तापमान वाढले होते. मे महिन्यात तर तापमान उच्चांक गाठत आहे म्हणूनच मे महिना जनतेसाठी जिकारीचा ठरत आहे. या महिन्यात कमाल तापमानाने उच्चांक गाठला आहे. विदर्भात तर उष्णतेची लाट आली आहे. विदर्भातील काही शहरांचे तापमान ४५ अंशाच्या पुढे गेले आहे. पारा ४५ अंशाच्या घरात गेल्याने नागरिकांची अक्षरशः होरपळ होत आहे. विदर्भासह राज्यातील काही भागात उष्णतेच्या प्रचंड लाटा वाहत आहेत. कोरडे व उष्ण वारे आणि वातावरणातील आर्द्रतेचे घटलेले प्रमाण यामुळे या उष्णतेच्या लाटा आल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. तापमानाचा पारा वाढत असल्याने उन्हाचा त्रास होऊन उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यात उष्माघाताने काहींचा बळीही गेला आहे. सध्या राज्यात उष्माघाताचे १६४ रुग्णांची नोंद झाली आहे. अर्थात ही संख्या फक्त सरकारी दप्तरी नोंद झालेल्या रुग्णांची आहे. नोंद न झालेले शेकडो उष्माघाताचे रुग्ण राज्यात आहेत. राज्यातील वाढते तापमान आणि वाढते उष्माघाताचे रुग्ण पाहता सरकारने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे तो योग्यही आहे असे असले तरी आवश्यक कामासाठी, लग्न, देवधर्म कार्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. ग्रामीण भागात कुलदैवतांच्या यात्रा सुरू झाल्यात. कंदुरीचे कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू आहेत. सण समारंभ साजरे करण्यासाठी, ग्राम दैवतांचे दर्शन घेण्यासाठी, नातेवाईकांच्या भेटीगाठी घेण्यासाठी लोकांची धावपळ सुरू आहे त्यामुळे उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागत आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिमाण माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. उन्हाळ्यात मधुमेहासारख्या व्याधी असणाऱ्या व्यक्तींनी विशेष खबरदारी घ्यायला हवी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळेत उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता देखील असते. उष्माघातापासून वाचण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावेच. दुपारी बारा ते चार यावेळेत घराबाहेर पडूच नये. काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना, टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कापडे परिधान करावेत. उन्हात काम करत असलेल्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे डिहायड्रेशन होते. डिहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते त्यामुळे चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये म्हणून सतत पाणी पित रहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराच्या बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत घ्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्या व फळांचे रस दररोज प्याले तरी हरकत नाही. उन्हाळ्यात आरोग्य बिघडतेच म्हणून प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करू शकतो.

**श्याम ठाणेदार**

## गॅस वाचवण्याचे सोपे उपाय

वाढत्या महागाईचा परिणाम भारतावरही दिसून येत असून अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेल आणि गॅसच्या किमती वाढताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत महिलांना घराचे बजेट सांभाळणे थोडे कठीण होत आहे. त्यामुळे आता स्वयंपाकघरात गॅसचा वापर काळजीपूर्वक करणे गरजेचे झाले आहे.

जर तुमचा LPG सिलेंडर साधारणपणे ३० दिवस चालत असेल आणि तुम्ही काही सोप्या किचन टिप्स अवलंबल्या, तर तोच सिलेंडर ४० ते ४५ दिवसांपर्यंत चालू शकतो. यामुळे वर्षभरात ३ ते ४ सिलेंडरची बचत होऊ शकते. आपण नकळत स्वयंपाकघरात अशा काही चुका करतो ज्यामुळे गॅस अधिक खर्च होतो. पण काही सवयी बदलल्यास गॅसची बचत सहज शक्य आहे.

**खाद्यपदार्थ झाकून शिजवा**

स्वयंपाक करताना भांड्यावर झाकण ठेवणे हा



सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे. भांडे उघडे ठेवल्यास वाफेसोबत उष्णता बाहेर जाते आणि पदार्थ शिजण्यासाठी अधिक वेळ लागतो. झाकण ठेवल्यास वाफ आतच राहते आणि पदार्थ लवकर शिजतो. यामुळे सुमारे २० ते २५ टक्के गॅसची बचत होऊ शकते.

**भांड्याचा योग्य आकार निवडा**

स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या भांड्यांचा आकारही गॅस बचतीत महत्त्वाची भूमिका बजावतो. छोट्या बर्नरसाठी छोटे भांडेच वापरावे. मोठे भांडे छोट्या बर्नरवर ठेवल्यास गॅस जास्त खर्च होतो आणि अन्न योग्य प्रकारे शिजत नाही. त्यामुळे बर्नरनुसार भांडे निवडणे आवश्यक आहे.

**डाळ आणि तांदूळ आधी भिजवून ठेवा**

डाळ, तांदूळ, राजमा किंवा छोले यांसारख्या पदार्थांना शिजवण्यापूर्वी किमान अर्धा तास कोमट पाण्यात भिजवून ठेवावे. त्यामुळे ते मऊ होतात आणि लवकर शिजतात. कुकरमध्ये कमी शिट्ट्या लागतात आणि गॅसची बचत होते.

**मध्यम आचेवर स्वयंपाक करा**

अनेकजण लवकर स्वयंपाक करण्यासाठी मोठ्या आचेचा वापर करतात, पण त्यामुळे गॅस अधिक खर्च होतो. मध्यम आचेवर स्वयंपाक केल्यास गॅस कमी खर्च होतो आणि अन्नही चांगले शिजते.

**प्रेशर कुकरचा अधिक वापर करा**

गॅस बचतीसाठी प्रेशर कुकर अत्यंत उपयुक्त आहे. कुकरमध्ये वाफेचा दाब निर्माण होतो, त्यामुळे अन्न पटकन शिजते. डाळ, भाजी, भात आणि इतर अनेक पदार्थ कुकरमध्ये बनवल्यास वेळ आणि गॅस दोन्हीची बचत होते.

**गॅस बर्नर स्वच्छ ठेवा**


जर गॅस बर्नरमधून पिवळी ज्वाळा येत असेल, तर याचा अर्थ गॅस योग्य प्रकारे जळत नाही आणि बर्नरची छिद्रे बंद झाली आहेत. त्यामुळे गॅस अधिक खर्च होतो. म्हणून वेळोवेळी जुन्या टूथब्रशने तसेच लिंबू किंवा बेकिंग सोड्याच्या मदतीने बर्नर स्वच्छ करावा. स्वच्छ बर्नरमुळे निळी आणि तीव्र ज्वाळा मिळते, ज्यामुळे गॅसची बचत होते.

गॅसची बचत करणे म्हणजे फक्त पैसे वाचवणे नव्हे, तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणेही आहे. जर तुम्ही या सोप्या किचन टिप्स रोजच्या सवयीमध्ये आणल्या, तर तुमचा LPG सिलेंडर अधिक दिवस चालेल आणि महिन्याच्या खर्चातही चांगली बचत होईल.

## उन्हाळ्यात एसी “ब्लास्ट”होण्याची कारणे, खबरदारी

आपल्या आजबाजूला घरात किंवा ऑफिसमध्ये अचानक एसीचा ब्लास्ट झाल्याचे आपण वाचत किंवा ऐकत असतो. पण तुम्हाला माहीत आहे का उन्हाळ्यात सर्वाधिक घटना या एसी “ब्लास्ट”च्या असतात. यामुळे जर तुमच्या घरात किंवा ऑफिसमद्येही एसी असेल तर प्रत्येकाने खबरदारी घेणे आवश्यक आहे.

त्यासाठी एसी ब्लास्ट का होतो हे समजून घ्यायला हवं. तर तज्ञानुसार सतत एसी चालू ठेवल्यामुळे कॉम्प्रेसर खूप गरम होतो. ज्याला ओव्हरहिटिंग



म्हणतात. त्यामुळेही ब्लास्ट होतो. तसेच जर तुमच्या घरात किंवा ऑफिसमध्ये निकृष्ट दर्जाचे वायरिंग असेल त्याचे कनेक्श्नन सैल असेल तर स्पार्क होऊन शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागू शकते.

तसेच एसीमधील रेफ्रिजरंट गॅस गळती झाल्यास धोकादायक परिस्थिती निर्माण होऊ शकते. जर फिल्टरमध्ये धूळ जमा झाली असेल तर एसीवर अतिरिक्त ताण येतो आणि तापमान वाढते. अशावेळी ब्लास्ट होण्याची शक्यता वाढते.अचानक व्होल्टेज बदलल्याने कॉम्प्रेसर खराब होऊ शकतो. त्यामुळे लो व्होल्टेज किंवा व्होल्टेज फ्लक्चुएशनमुळे देखील एसीचा ब्लास्ट होवू शकतो.जर तुमच्याकडे जुना किंवा खराब एसी असेल आणि अनेक वर्षे त्याची सर्व्हिसही न केलेली असेल तर एसी जास्त धोकादायक ठरतात.

काहीजण स्वस्त असल्याने एसीमद्ये स्वस्त किंवा डुप्लिकेट निकृष्ट दर्जाचे पार्ट्स वापरतात. पण त्यामुळे एसीला आग लागण्याचा धोका वाढतो.

**या सर्व घटना टाळता येणे सहज शक्य आहे. त्यासाठी काय करावे ते बघूया.**

उन्हाळा सुरू होण्यापूर्वी एसीची पूर्ण तपासणी करून घ्या.स्टॅबिलायझर वापरावे. व्होल्टेज फ्लक्चुएशनपासून संरक्षण मिळते.फिल्टर स्वच्छ ठेवावे. १५–३० दिवसांनी फिल्टर साफ करा. सतत अनेक तास एसी चालू ठेवू नये.

## पाण्यात तरंगणाऱ्या रस्त्याचं गाव

जर तुम्ही निसर्गप्रेमी आहात आणि हिरवागार निसर्ग आणि निळेशार पाण्याच्या सान्निध्याच्या शोधात असाल तर केरळमधील वेलिनायड या गावाला नक्की भेट दया. कारण हे गाव हिरव्यागार निसर्गाबरोबरच पाण्यात तरंगणाऱ्या रस्त्यांसाठी प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे येथे समुद्राच्या तळापर्यंत जमीन असून रस्ते चक्क पाण्यात तरंगतात. या गावाला वेनिस असंही म्हटले जाते.



कारण या गावात पाणी सर्वत्र पाहायला मिळत.रस्ते पाण्यावर आहेत. तसेच एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी नावेतून जावे लागते. त्यामुळे घरही पाण्याने वेढलेली आहेत. हा मनमोहक नजारा बघण्यासाठी दरवर्षी पर्यटक येथे मोठी गर्दी करतात. येथे येण्यासाठी ऑक्टोबर ते मार्च हा बेस्ट सिझन मानला जातो. तर मे जून मध्येही येथे पर्यटक येतात. येथे येण्यासाठी अलप्पुझा रेल्वे स्टेशनला उतरावे लागते. तेथून टॅक्सी किंवा स्थानिक नावेतून वेलियानाड येथे सहज पोहचता येते. येथे बजेट फ्रेंडली हॉटेल्स आणि हाऊसबोटही आहेत.